मळमळ राहणार नाहीं. अर्थात् ज्या योगानें एवढा मोठा भयदुःखरूप संसाराचा गराडा आपल्या भोंवतीं पडला आहे असें तें आपल्या तात्विक आत्मवस्तुस्वरूपाविषयीं आपल्यास अज्ञान ह्मणजे काय आहे, हा प्रश्न क्षणभर तरी विचारणीय आहे; तेव्हां त्याविषयीं थोडक्यांत रहस्यार्थ तेवढा प्रत्येकानें लक्षांत घेणें योग्य आहे.

येथें असें कोणी समजूं नये कीं, आपल्यास आपले विषयीं अज्ञान ह्मणजे आपल्यास आपण कांहींच माहीत नाहीं. असा अर्थ मुळींच नाहीं; आपल्यास आपण कांहीं तरी माहीत आहोंच. माझा मी आहें असा सर्व आबालवृद्धांना अनुभव आहे मी नाहीं किंवा आपण नाहीं असें कधींही कोणास वाटत नाहीं. आपल्या स्वताला आपण विसरलों असें कोणासही आठवत नाहीं. अथवा 'काय करावें, बुवा! आज मोठ्या गर्दीत मी सांपडलों गेलों; आणि तिच्यांत मी आपला हरवलों!' असा प्रकार, घडून कधीं कोणी दुश्चित्त होऊन बसत नाहीं. सारांश, प्रत्येकाला आपल्या स्वताचे अस्तित्वाविषयीं पूर्णभान आहे, पूर्ण परिचय आहे, त्याबद्दलची स्मृति अगदीं निरंतर धड आहे. आपण काल जसे होतों तसेच आज आहों, आणि उद्यांही पण तसेच आपण असणारे आहों, अशा रीतीनें आपल्यास आपण समजून आहों; असें ज्या अर्थी आहे त्या अर्थी आतां आपल्यास आपले विषयीं अज्ञान आहे, या ह्मणण्यांतील काय अभिप्राय आहे? असें विचारणाऱ्यापासून एकार्थी मोठा संतोष वाटतो; पण त्याचे बरोबर थोडा खेदही आह्मांस वाटत आहे. 'आपण आपले आहों' याविषयीं संशय किंवा अपरिचय कोणासही कधीं नाहीं हें सत्य; पण तेच आपण आपले तत्त्वतः काय आहों अशी विशेष परिस्फुटता त्यांत होतेशी दिसत नाहीं. आपल्यास आपण 'माहीत आहों' तें सरसकट कांहीं तरी आपण आहों असलें ढोबळ

ज्ञान तें आहे. त्यांत विचाराचा भाग दिसत नाहीं, त्यांत बरोबर निवड होत नाहीं. ह्मणजे शरीर, इंद्रियें, प्राण, मन, बुद्धि, अहंकार इत्यादिरूप जो हा एक समुदाय, तोच आपण किंवा आत्मा असलें एक सरसकट सांवळ्या गोंधळाचें ज्ञान मनुष्यमात्रास आहे, किंबहुना प्राणिमात्रास आहे असें ह्मटलें तरीही चालेल. चालू व्यवहारांत असल्या ज्ञानास थोडीशी किंमत आहे; पण तत्त्ववेत्ते पुरुष या व्यवहारासच अगोदर मुळीं किंमत देत नाहींत; मग त्यांतील शहाणपणाची ते काय पर्वा ठेवतील? एरवीं, आत्मा ह्मटला ह्मणजे त्याच्या महिम्यास पारच नाहीं. आत्मा म्हणजे आपण असाच त्याचा मराठींत अर्थ सांगावयाचा. आपण त्रिकाळीं आहों किंवा असावें या अभिप्रायाने जे नुकतेच सर्वसाधारण उद्गार काढले, त्यांवरून आपण ह्मणजे आत्मा हा पदार्थ तसाच त्रिकालीं अबाधित असणारा ठरतो; आणि आत्मा या शब्दाच्या मूळ अर्थाचें स्वरूपही तसेंच आहे. ह्मणजे जी वस्तु सर्वत्र, सदासर्वदा विद्यमान तीच आत्मा. तीच आत्मा या शब्दांतील भावार्थभूत वस्तु. अर्थात् सर्वत्र सर्वदा समरस विद्यमानत्वरूप जें आत्मत्व, तें देह, इंद्रिय, प्राण, मन, बुद्धि, इत्यादिरूप समुदायांत किंवा त्यांतील प्रत्येकांत आहे असें विचारदृष्टीस पटत आहे काय? मुळींच पटत नाहीं. तर मग त्यास 'आत्मा' असें कसें म्हणावें? व तसें कसें समजावें? एवंच केवळ त्यांत तशा प्रकारच्या आत्मतत्वाची खूण पटण्यासारखी स्थिति तर नाहीं; असें असून त्या समुदायास किंवा त्यांतील एखाद्या घटक पदार्थास आत्मा असें समजणें; आणि जो वास्तविकच आत्मा आहे त्यास तसें न समजणें याचें नांव अज्ञान. देहेन्द्रियादि समुदायावर आत्म्याचें पूर्वोक्त लक्षण नाहीं हें आम्ही पुढें ओघाओघानें सांगणार आहों. तात्पर्य, खरें काय 'आहे' तें ओळखलें आकळून

त्याच्याबद्दल नसतेंच विपरीत भासणें असा कोणी एक विलक्षण पदार्थास ‘अज्ञान’ असें म्हणण्याचा आमचा संप्रदाय आहे. यास ‘माया’ असें म्हणण्यांतील अभिप्राय हाच कीं, अचिन्त्य आणि अनंत आश्चर्यरूप ही जिन्नस आहे. दुसऱ्या एका अभिप्रायास्तव यास शक्ति असें म्हणतात. दोरी खरोखर असतांना सर्पसा भासतो यास काय म्हणावें! म्हणजे येथें अगोदर दोरीविषयीं न कळणें हें कबूल केलेंच पाहिजे. सर्प भासणें हा आश्चर्यकारक एक चमत्कार तर आहे हें खास. भीति वाटून वृत्ति गांगरून जावी अशी कांहीं तरी एक ही शक्तिच समजली पाहिजे. आतां दोरी जशी डोळ्यानें दिसणार, तसा तिजवर सर्पही डोळ्यानेंच भासणार. पण, आहे तशी दोरीच दिसते येथें डोळा कसा, आणि सर्प भासतो, तेव्हांचा तोच डोळा, परंतु कसा आहे? म्हणजे त्यांत कांहीं तरी अन्यथा प्रकार झाला असें म्हटलेंच पाहिजे. तात्पर्य, दृष्टिमध्यें कांहीं तरी दोष झाला. आतां दोषाची सिद्धि तरी दृष्टीनेंच होणार; तेव्हां यावरून खरोखर दृष्टीचें स्वरूपच दूषित आहे असें म्हणतां येत नाहीं. शिवाय मागाहून पदार्थाचें स्वरूप जसेंचें तसेंच पूर्ववत् प्रतीतीला येतें, यावरूनही विचार करून पाहतां, दृष्टीचें स्वरूप निरंतरचेंच दूषित आहे असें ठरलें जाणार नाहीं. एवंच दोष हा केवळ एक आगंतुक प्रकार आहे, आणि दृष्टि नित्य असंग व निर्मळच आहे असेंच मानलें पाहिजे. तेव्हां अज्ञान म्हणजे हा एक चमत्कारिक मूळ आगंतुक दोषच आहे. त्या योगानें आपलें तात्त्विक स्वरूप जसेंच्या तसें लक्षांत येईनासें होतें. म्हणून आतां अगोदर शास्त्रदृष्टीनें आणि तत्त्ववेत्त्या सज्जनांचे कृपादृष्टीनें आपल्या या आत्म्याचें तात्त्विक स्वरूप कसें काय आहे, त्याचें लक्षण म्हणजे स्वरूपलक्षण वगैरे काय आहे हें समजून घेतलें पाहिजे. कारण त्याविषयींचें तसें ज्ञान

होणें हेंच त्या अज्ञानाख्य दोषाचें निवर्तक आहे. यथार्थ ज्ञान हें त्या अज्ञानरूप दोषास क्षालन करणारें आहे हें आर्थिकच सिद्ध आहे. अज्ञानमूलक भयदु:खरूप संसारबंधाचे नाशास आत्मतत्त्वज्ञान हा एकच उपाय आहे, अन्य उपाय व्यर्थ आहेत याबद्दल आमचे आलीकडील जगत्प्रसिद्ध तत्त्ववादि महासाधु पुरुषांचे कसे बाणेदार आणि एकजात उद्गार आहेत तेही येथें आह्मी नमूद करतों.

वांचूनि ज्ञानेंवीण एके, उपाय करिसि जितुके ।
तिहीं गुंफसि अधिकें, रुखिं इये ॥
आपुलिया अज्ञानासाठीं, नव्हता थांवला किरीटी ।
तरी आतां आत्मज्ञानाच्या लोटी, खांडेनि गा ॥
म्हणोनि स्वधर्मीचिया घाया, औषध घेवोचि धनंजया ।
तेवीं अज्ञानमुळीं यया, ज्ञानचि खड्ग ॥
मूळ-बीज अविद्या खाय, तें ज्ञान जैं उभें होय ।
तैंचि यया अंत आहे, एरवीं नाहीं ॥ (ज्ञानेश्वरी.)

माया ब्रह्म ओळखावें, आपणास आपण जाणावें ।
इतुक्यासाठीं स्वभावें, चुके जन्म ॥
म्हणोनि नेणणें खोटें, नेणते प्राणी ते करंटे ।
जाणतां विवरितां तुटे, जन्ममरण ॥
एक जाणणें करूनि परतें, कोण सोडवील प्राणियातें ।
जाणत्यास जाणतां तुटतें, मूळ मीपणाचें ॥
एरवीं ब्रह्मज्ञानेंवीण, जें जें साधन तों तों शीण ।
नाना दोषांचें क्षाळन, होईल कैचें ॥
अभ्यासिल्या आत्मज्ञान, सर्व कर्म होय खंडन ।
हे रोकडी ग्रंथींत प्रमाण, संदेह नाहीं ॥
प्राणी [illegible] ओळखा, आधीं [illegible] जाणीव कळा ।

सकळ आम्हतां निराळा, सहजचि आहे ॥
बंधन म्हणजे कांहींच नाहीं, परी वेढा लाविलें सर्वांही।
यासि उपायचि नाहीं, कळल्यावांचूनि ॥
स्वप्नामध्यें जो बांधला, तो जागृतीनें मोकळा केला।
ज्ञानविवेकें प्राणियाला, मोक्षप्राप्ति ॥ (दासबोध.)

या सर्व वचनांतील भावार्थ इतकाच कीं, मोक्षाचे प्राप्त्यर्थ एका आत्मतत्त्वज्ञानावांचून जितके म्हणून उपाय करावेत, त्यांच्या योगानें या संसाररूप वृक्षाचे ठिकाणीं अधिकाधिक गुंतागुंत मात्र आपली होणार. आपल्या तात्त्विक स्वरूपाविषयींच्या अज्ञानास्तवच केवळ या संसाराचें उगाच एवढें स्तोम माजलें आहे! अर्थात् आत्मतत्त्वज्ञानाच्या शस्त्रानें त्यास छाटून टाकलें पाहिजे. ज्याप्रमाणें स्वप्नांत आपले शरीरास झालेल्या जखमेवर जागें होणें हेंच औषध आहे, त्याप्रमाणें जर एक अज्ञानच या संसाराचें मूळ आहे, तर तें छाटून टाकण्यास तत्त्वज्ञान हेंच एक शस्त्र पाहिजे. म्हणजे या प्रचंड संसारतरूला मूळ बीजभूत जी अविद्या अथवा अज्ञान, त्याला ग्रासणारें आत्मतत्त्वज्ञान जेव्हां उदयास येतें, तेव्हांच या संसारतरूचा अंत म्हणजे नाश होतो. एरवीं दुसऱ्या कशानेंही या दुःखरूप संसाराचा नाश होणें नाहीं. म्हणजे आत्मतत्त्वज्ञानावांचून कोट्यावधि जरी साधनें केलीं तरी मोक्षास पात्र होतां येत नाहीं. तेव्हां अगोदर माया, ब्रह्म, आत्मा, यांतील रहस्य अनुभवावें. म्हणजे मग एवढ्यानेंच भयदुःखरूप संसाराचा परिहार होतो; असो. एकंदरींत आत्मतत्त्वस्वरूपाविषयींच्या अज्ञानापासून भयदुःखरूप संसारबंध प्राप्त होतो; आणि आत्मतत्त्वज्ञानापासून नित्यानंदरूप मोक्ष मिळतो. याबद्दल प्रमाणार्थ म्हणून जशीं आम्हीं श्रुतिस्मृतिवचनें निर्दिष्ट केलीं, त्याप्रमाणें सर्वथा विश्वसनीय आणि मोठे अनुभवी अशा सज्जनांचे निवडक उद्गारही प्रमाणार्थ सादर केले

आहेत. इतक्याही उपर या मोक्षरूप पुरुषार्थाचे बाबतींत उपायाविषयीं जो कोणी साशंक राहील त्याचें समाधान करण्यास येथें कोणीही आम्हांस समर्थ दिसत नाहीं. तेव्हां कांहीं एक मळमळ न ठेवतां, इतर फंदांत न पडतां, कोणाच्या नादीं न लागतां, प्रत्येकानें निमूटपणें आत्मतत्त्वज्ञानाचे मार्गाकडेसच वळावें, असें त्यास आमचें जीव तोडून सांगणें आहे. आतां यापुढें आपल्या आत्म्याचें तात्त्विक ज्ञान किंवा दर्शन म्हणजे साक्षात्कार होणार कसा? याबद्दल अवश्य कर्तव्य काय आहे तेंही शास्त्रानें सांगून ठेवलें आहे. शास्त्राचा येथें असा आक्रोश आहे कीं—

आत्मा वारे द्रष्टव्यः श्रोतव्यो मंतव्यो निदिध्यासितव्यः।

म्हणजे जर आत्मतत्वाचें दर्शन किंवा साक्षात्कार अवश्य अपेक्षित आहे तर त्या साक्षात्काराचे उद्देशानें आपल्या आत्म्याचे तात्त्विक-स्वरूपाविषयीं प्रथम श्रवणच केलें पाहिजे. म्हणजे त्याचें लक्षण आणि स्वरूप काय आहे, कसें आहे तें सर्व ऐकून ध्यानांत घेतलें पाहिजे; नीट सप्रमाण व सयुक्तिक रीतीनें समजूनच घेतलें पाहिजे. हेंच पहिलें साधन, या परतें आणखी वेगळें असें पहिलें साधन नाहींच नाहीं. कानावाटे ऐकून घेतलें तरी विचार केलाच पाहिजे. म्हणजे श्रवणाच्या रूपानें समजून घेतलें तरी संशयादिक असण्याचा संभव आहे. भ्रमांश असण्याचा संभव आहे; असंभावना व विपरीत भावनाही वाटण्याचा संभव आहे; यास्तव उपपत्तीसह विचारही वारंवार केला पाहिजे, याचें नांव मनन. हें पुढलें दुसरें साधन. हें साधन म्हणजे केवळ विचाररूप आहे. विचारांतीं निश्चयापर्यंत मजल पोंचावयाची म्हणजे मोठीच गोष्ट आहे; अर्थात् ध्यानाभ्यास करीत राहिलें पाहिजे. म्हणजे निश्चित केलेल्या इष्ट किंवा उद्दिष्ट वस्तूचे ठिकाणीं तदाकार स्थितीनें असण्याचा कसोस अभ्यास घडला पाहिजे; म्हणजे मग दृढापरोक्ष साक्षात्कार होणार.' एवंच श्रवण, सोपपत्तिक

विचार, आणि निश्चयपूर्वक वस्तुध्यान हीं तीनच उत्तरोत्तर श्रेष्ठ अशीं साक्षात्काराविषयीं साधनें शास्त्रांत निर्दिष्ट केलेलीं आहेत. यांपैकीं प्रथम श्रवण पाहिजे, म्हणजे समजून घेणें हें पहिलें काम. श्रवण केलेंच नाहीं, समजून घेतलेंच नाहीं, तर विचार कशाचा करावयाचा? अर्थात् श्रवणानें समजून घेतलें तर मग विचाराला जागा; आणि विचारानें निश्चय झाला तर एकाग्रवृत्तीनें पुढें ध्यानाभ्यास घडणार, नाहीं तर चित्त डळमळेल. म्हणून विचारपूर्वक निश्चयानंतर ध्यानरूप योगाभ्यासास लागलें पाहिजे असा हा क्रमिक साधनप्रकार ठरला आहे. हा यथास्थित घडल्यास साक्षात्कार, प्रत्यय किंवा अनुभव मिळालाच पाहिजे. या साधनत्रयावांचून दुसरें कोणतेंही येथें साधन शास्त्रसंमत नाहीं, हें आम्ही इतकें बजावून सांगतों याचें कारण, असें कीं, आचरट लोकांत आत्मतत्त्वानुभवाच्या साधनाविषयीं अशा कांहीं विलक्षण कल्पना आहेत कीं, त्या त्यांच्या तोंडांतून तत्ववेत्यास एखादे वेळेस ऐकण्याचा प्रसंग आल्यास त्याला फार खंत वाटते. फार काय सांगावें! या विचारशील अनुभवशाली तत्ववेत्यास अशा लोकांपुढें कधीं कधीं मुकाट्यानें बसावें लागतें. खरेंच आहे 'आंधळे परीक्षवंत मिळाले, तेथें डोळसाचें काय चालें,' या समर्थवचनाप्रमाणें तेथें प्रकार होणारच, असो. आत्मतत्त्वसाक्षात्कारास श्रवणमनननिदिध्यासरूप अभ्यासच साधन आहे, असा शास्त्राचा नित्य घंटाघोष आहे, इकडे कोणीही दुर्लक्ष करूं नये, अशी आमची अगत्याची सूचना आहे. तेव्हां अगोदर आतां श्रवण कर्तव्य आहे, यानें समजून घेणें आहे, हें तर ठरलेंच आहे. पण ज्या अर्थीं श्रवण करणें किंवा समजून घेणें आवश्यकच आहे त्या अर्थीं येथें मुमुक्षु जिज्ञासु अशा साधकास त्या आत्मतत्त्वाची ओळख करून देणारा म्हणजे समजावून सांगणारा शास्त्रनिपुण आणि अनुभवी असा

तत्त्ववेत्ता बोधक श्रीगुरूही मिळाला पाहिजे. यानें तो मिळविला पाहिजे. अर्थात याला उत्कट इच्छा झाली तर त्याला तो मिळतोच मिळतो.

येथें हा एक सिद्धान्त आहे; तो सांगितला पाहिजे. म्हणजे कोणतीही विद्या असो, ती सद्गुरूवांचून उदयास येतच नाहीं. विद्या पाहिजे असल्यास सद्गुरूला शरण गेलेंच पाहिजे; सद्गुरूला वरलेंच पाहिजे, ही गोष्ट सर्व जगाला केव्हांही आणि कोठेंही कबूल आहे. सद्गुरूवांचून युगत कळतच नाहीं. अटकळच साधली जात नाहीं. गुरूवांचून कोणतेंच ज्ञान होत नाहीं, याबद्दल कोणासही परिहार देऊन सांगावयास नको आहे. गुरूवांचून कोणतेंही ज्ञान उदयास येतें असें आजपर्यंत कोणीं ऐकलेंच नाहीं. गुरूवांचून आपल्यास ज्ञान होईल किंवा झालें आहे ही कल्पनाच घातुक आहे, अत्यंत भयप्रद ही कल्पना आहे. ज्ञान स्फुरूं लागलें ह्मणजे गुरुसिद्धि आर्थिकच आहे. कोणत्याही विद्येस सद्गुरु हा दाता असलाच पाहिजे असें आह्मीं प्रथमच ह्मटलें आहे, तेव्हां ह्या आत्मतत्वविद्येचे बाबतींतही त्या सद्गुरूची अपेक्षा आहे हें कांहीं नव्यानें सांगावयास नको. बुद्धि मंद असेल तर विद्योदयास विलंब होईल; आणि बुद्धि निर्मळ, निश्चल आणि तीव्र असेल तर तो विद्योदय त्वरित होईल, तरी पण सद्गुरुपासून संस्कार करून घेतलाच पाहिजे. ग्रंथापासून ज्ञान होत असतें असा एक समज आहे; त्यांत थोडेंसें तथ्य आहे, ह्मणजे ग्रंथ स्वतः जडरूप जरी आहे, तरी गुरुमुख झाल्यानें अभ्यासशीलास ग्रंथापासून उपयोग आहे, अशा रीतीनें पाहतां ग्रंथाकडेही गुरुत्व येतें. तेव्हां ग्रंथ ह्मणजे श्रीगुरूची वाङ्मय मूर्तीच आहे. ह्मणजे मग गुरुपासूनच ज्ञान मिळतें, या नियमास अपवादक कांहींच नाहीं. गुरुवांचून ज्ञान नाहीं हें तत्व आबालवृद्धांस कबूल असतांना आम्ही याबद्दल इतकें लिहून बोलतों याचें कारण इतकेंच कीं, जगांत असे

कांहीं व्यर्थ घमेंडखोर लोक असतात कीं, त्यांना ज्ञानासंबंधानें कोणा एका व्यक्तिविशेषाचें आपण अंकित झालों हें कबूल करून जाहीर होऊं देण्याबद्दल अत्यंत हीनता व लज्जा वाटत असते. एरवीं चोरटेपणानें तत्ववेत्यांचे प्रत्यक्ष ज्ञानजनक उद्गार किंवा त्यांचे ग्रंथोक्त ज्ञानमय विचारांचे उल्लेख बुद्धींत गुंडवून आपण स्वताच स्वयंज्ञानवंत ह्मणवून घेण्याबद्दल मात्र लाळ घोटीत असतात. हे लोक, धनाढ्य आणि बहुश्रुत व्यवहारपंडित अशा संसारसुखलंपटांचे जातींत प्रायः नजरेस येतात. यांचे मनांतील गुप्त आशय हाच कीं, दमडी खर्चे केल्यावांचून, खुशामत केल्यावांचून आणि सेवेबद्दल शरीरानें ईषन्मात्रही क्लेश सोसल्यावांचून या तत्ववेत्त्या साधूंचें इंगित आपल्या हातीं आलें. झालें काम. चला आतां खुशाल संसारसुखाची मजा मारीत बसूं या; आणि मी पुरा शहाणा व जग वेडगळ ह्मणून त्यावर टीका करीत रिकामपणाचे वेळीं करमणूक करून घेऊंया !!! हर हर ! धिक्कार असो असल्या शठांस ! या शिवाय इतर अज्ञान जड लोकांचे निरनिराळे अनेक दण्डकप्रवाह आहेत ते वेगळेच. ते सर्व प्रकार एकीकडेस असोत. खऱ्या मुमुक्षूनें मात्र नित्यानंदरूप मोक्षास साधनीभूत आत्मतत्वज्ञानाचे करितां श्रीसद्गुरूस शरण जावें इतकी त्यास खूणगोष्ट आम्ही सांगून ठेवतों. याबद्दल वेदशास्त्रांची सर्व जिज्ञासु साधकांस अशी निरंतर आज्ञा आहे कीं,

तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् । आचार्यवान् पुरुषो वेद, नैषा तर्केण मतिरापनेया प्रोक्तान्येनैव सुज्ञानाय प्रेष्ठेति । प्राप्य वराभिबोधत । एतच्छ्रुत्वा संपरिगृह्य मर्त्यः प्रवृह्य धर्म्यमणुमेतमाप्य स मोदते मोदनीयं हि लब्ध्वा विवृतं सद्म

नाचिकेतसं मन्ये। श्रुतं ह्येव मे भगवद्दृशेभ्य आचार्याद्धैव विद्या विदिता साधिष्ठं प्रापयतीति ॥ तस्मादात्मज्ञं ह्यर्चयेद्भूतिकामः। यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः ॥ आचार्यदेवो भव। तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया॥ उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः ॥

असो जयास मोक्ष व्हावा, तेणें सद्गुरु करावा,
सद्गुरूवीण मोक्ष पावावा, हें कल्पांतीं न घडे ॥
सद्गुरुकृपेचेनि बळें, अपरोक्ष ज्ञानाचेनि उसाळें
मायेसहित ब्रह्माण्ड सगळें, दृष्टीस नये ॥ (दासबोध.)
ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल, तैं मोहांधकार जाईल,
जैं श्रीगुरुकृपा होईल, पार्था गा ॥
म्हणोनि जाणतेनें गुरु भजिजे, तेणें कृतकार्य होईजे,
जैसें मूळ सिंचनें सहजें, शाखा पल्लव संतोषती ॥ (ज्ञानेश्वरी.)

या सर्व वचनांचा इत्यर्थ असा आहे कीं, आत्मतत्वज्ञानांवाचून मोक्ष नाहीं, आणि तें तत्वज्ञान श्रीसद्गुरुवांचून मिळत नाहीं. तेव्हां या मुमुक्षु आणि ज्ञानेच्छु साधकानें विनयपूर्वक कृपापात्र अशा दीन वृत्तीनें त्या ज्ञानाकरितां श्रीगुरूस शरण जावें. असा एक श्रीगुरु त्यानें धुंडून काढावा. तो शास्त्रार्थ ज्ञानकुशल असून ब्रह्मनिष्ठ असावा. म्हणजे त्या सद्गुरूचें मुख्य लक्षण असें कीं, त्याचे जवळ योग्य शंकेचा परिहार करण्याइतकें शास्त्रीय बुद्धिकौशल असून, मुख्यत्वेंकरून तो अनुभवी असला पाहिजे. अर्थात् त्या ज्ञानानेंच साध्य असा जो परम आनंद, त्याचे लाभानेंच तो कृतार्थ, नित्य संतुष्ट, सदाप्रसन्न, निर्भय, निःशंक, निश्चिंत, सर्वदा त्या बोधानें स्फुरद्रूप, तन्निष्ठ, स्वप्रकाशी,

तदेकसमाधानप्रतिष्ठित असा तो खचित असला पाहिजे. अशा तऱ्हेचा गुरु ज्या साधकास लब्ध होतो, त्यासच त्या गुरूची विद्या फलद्रूप होते, तो साधक शिष्य ज्ञानसंपन्न होतो; त्या गुरूस आचार्य म्हणावें. आचार्य ह्मणजे स्वताच्या ज्ञानानुसार ज्याचें आचरण व त्याचप्रमाणें दुसऱ्याकडून आचरण करविणें अशी ज्याची मनोवृत्ति, ता आचार्य-संज्ञेस पात्र होतो. 'गुरु' हा शब्द मनांत आला कीं, त्यांतील अर्थांत कांहीं तरी ज्ञानरूप प्रकाश भरलेला आहे असाच तो वाटला पाहिजे. तसा ज्ञानरूप प्रकाश ज्या पिण्डांत सिद्ध झालेला असतो त्या पिण्डास 'गुरु' असें ह्मणणें गौण आहे. पण तदंतर्गत त्या ज्ञानरूप प्रकाशास गुरु असें ह्मणणें मुख्य आहे. आणि शिष्य ह्मणजे, तो गुरुसंज्ञित ज्ञानरूप प्रकाश प्रतिबिंबण्यास योग्य असें तद्भिन्न पिण्डांतील जीवंत परंतु अप्रकाश असें जें हृदयधाम, त्यासच शिष्य असें म्हणावें. न समजलेलें तत्व असंदिग्धपणें सप्रत्यय जो समजवून देतो, तोच वास्तविक गुरु; आणि तसें समजून घेतो, तोच वास्तविक शिष्य. शांत जळत असलेला दिवा हा गुरु; आणि त्यावर लागत असणारा जो दुसरा दिवा, ह्मणजे चेत घेणारा काकडा, हा शिष्य, असा गुरुशिष्यांच्या स्वरूपांतील प्रकार आहे. समविद्येस्तव उभयतांचा संबंध घडतो. अर्थात् देहसंबंध सोडून दोघांचे स्वरूप समच असतें, असो. मुख्य मुद्दा इतकाच आहे कीं, कोणत्याही ज्ञानाची प्राप्ति होण्यास गुरूची आवश्यकता आहे; त्याप्रमाणें प्रस्तुत आत्मतत्वज्ञानाचे बाबतींतही श्रीगुरूची आवश्यकता असतेच असते; हें मर्म कोणीही कोणत्याही प्रकारच्या घमेंडीमुळें दुर्लक्षित करूं नये. त्यांतही श्रीगुरूची प्रसन्नवृत्ति असण्याविषयी सच्छिष्यानें सेवाधर्मानें यावज्जीव वागण्याविषयीं नित्य सावध असलें पाहिजे

सच्छिष्य तसा असतोच; परंतु मर्यादेप्रमाणें सूचना करणें शास्त्राचें कर्तव्य आहे. श्रीगुरु आणि त्याची सेवा याविषयीं संसारलंपट जीवांची अनेक प्रकारची कुत्सित बुद्धि असते, तिजकडे स्वहितसाधु सच्छिष्याची दृष्टि कशाला जाणार? गुरुशिष्यांचे संबंधांत दोष असलेच आणि ते उघडकीस आले तर जग शासन करीत असतेंच पण सर्वसाक्षीभूत परमात्माही त्याबद्दल शासन करतोच; आणि जेथें दोष असून ते गुप्त राहतात, तेथेंही तो परमात्मा शासन करण्यास सिद्ध आहेच; परंतु लोक कुटाळक्या करतात म्हणून गुरुशिष्यांतील निर्मल विद्यासंप्रदाय मोडण्याविषयीं कोणाही सच्छिष्य साधकाची वृत्ति सिद्ध होणें किंवा असणें हें सर्वथा अनुचित आहे. कुत्सित लोकांच्या निष्कारण कुटाळक्यांची या साधक मुमुक्षुजीवानें मुळींच पर्वा करतां कामा नये. त्यांच्या त्या कुटाळक्यांस भिवून राहावें तर स्वहितास मुकावें, शास्त्राज्ञेचें उल्लंघन करावें, सद्‌गुरुपरमेश्वरप्रसादास अपात्र ठरावें अशी शोचनीय अनर्थपरंपरा ओढवेल हें प्रोक्तपणें लक्षांत ठेवून धैर्य धरून सद्विद्यासंप्रदायाचा उत्कर्ष जेणेंकरून होईल अशी तत्परता शुद्ध अंतर्यामपूर्वक अखंड जागरूक ठेवणें हें तर पवित्र गुरुशिष्यांचें आद्य कर्तव्यकर्म आहे, असो. आपल्यास साधन कळत नाहीं, मार्ग समजत नाहीं, बुद्धि कुंठित होते, अशा वेळीं कशी स्थिति होते हें ज्याचें त्यासच ठाऊक. तेथें आपल्यास उद्बोध व्हावा अशी तळमळ लागली असतां, ज्यापासून तो होऊं लागतो त्याविषयीं गुरुबुद्धि म्हणजे 'हा माझा ईश्वर' अशीच खुणगांठ यानें बांधून ठेवावी. म्हणजे अशी उद्बोधक होणारी व्यक्ति ही ईश्वरीय मूर्तीच आहे. हा चालता बोलता ईश्वर आहे. असेंच निःसंशय समजून या जिज्ञासूनें त्याची सेवा नित्य केली पाहिजे. म्हणजे पण, एकान्तांत बसून त्याच्या पुतळ्याचें ध्यान किंवा मानसपूजन करणें

असा अर्थ नाहीं. तर जेणें करून तो प्रसन्न राहील अशी सर्वभावें-करून त्याची प्रत्यक्ष सेवा करणें हाच मुख्य अर्थ आहे. शिष्य म्हणजे गुरुपुत्र. अर्थात् या पुत्रास या गुरुरूप पित्यापासून नवीन एक अंतरंग ज्ञानमय रूप मिळतें, त्यांत तात्विक जीवित उत्पन्न होत असतें. यास्तव हा शिष्य सर्वथा गुरूचा अंकित असणें हें स्वाभाविकच आहे. उभयतांचें एकमन, एकप्राण, एकजीव झाल्यास यापेक्षां कौतुकाची गोष्ट दुसरी कोणती अधिक आहे! सुबुद्ध सच्छिष्यास अशा प्रत्यक्ष गुरुरूपी ईश्वरमूर्तीपुढें, काष्ठपाषाणाकार ईश्वरीय निर्जीव पुतळ्याची अपेक्षा थोडीच वाटणार! किंबहुना ज्ञानाचा उदय करून न देणाऱ्या आणि उगाच गुरु गुरु म्हणून मिरविणाऱ्या चालत्या बोलत्या पुतळ्याबद्दलही त्यास लेशमात्रही महती वाटावयाची नाहीं. सारांश, जेथें आपला हिशोब जुळेल, जेथें साधन आणि समाधान निःसंशय, प्रत्यक्ष, युक्तिशुद्ध, प्रतीतीस येईल, तेथें या साधकानें आपणास सर्वथा वाहून घ्यावें, असो. गुरुशिष्यसंस्था अवश्य पाहिजे.

मनुष्यतनूची दुर्लभता आणि योग्यता नित्य लक्षांत असलीच पाहिजे, सांसारिक विषयोपभोग मिळविण्याचें ज्ञान तर मुंगीला देखील आहे, भयाच्या प्रसंगीं यथाशक्ति आपला बचाव करण्याविषयीं प्रयत्न व प्रबोध त्या मुंगीचे ठिकाणींही असतो, आत्मतत्वज्ञानाव्यतिरिक्त सर्व जीव एकाच किंमतीचे आहेत. अर्थात् आत्मतत्वज्ञान मिळण्याची योग्यता मात्र या मनुष्यतनूंतील जीवात्म्यास आहे. ती इतर पामर जीवांस नाहीं, यावरून मनुष्याच्या उत्पत्तीचा जर एखादा असाधारण हेतु असला तर तो हाच असावा कीं, त्यानें आत्मतत्वज्ञान मिळवावें जगज्जीवनास ओळखावें, अशा रीतीनें आत्मोद्धार करावा, आणि निर्भयपणें त्रिकाळीं अखंड सुखरूप होऊन दुःखरूप संसार-चक्रभ्रमणापासून आपणास मुक्त करून घ्यावें, या प्रकारची योग्यता

आपल्याहून इतर प्राण्यांस नाहीं, हें या मनुष्यानें पक्कें ध्यानांत आणावें, आयुष्याचा कांहीं भरंवसा नाहीं. आरोग्य आणि सामर्थ्य यांचाही कांहीं विश्वास मानतां येत नाहीं. आत्मोद्धाराचें हें अतिपवित्र आणि मंगलकार्य आपल्याकरितां दुसरें कोणी तरी करील असें तें मुळींच नाहीं. अंतकाळीं आयत्या वेळेस तें आपण उरकून घेऊं असें ह्मणून दिरंगाई करण्यासारखेंही हें कार्य नाहीं. अंतकाळीं याची वासना जें रूप घेऊन उभी राहील, त्या रूपासारखें या जीवात्म्यास झालें पाहिजे. हातांतून सुटून गेलेला बाण जसा आपल्या स्वाधीन व्हावयाचा नाहीं, त्याप्रमाणें सावध आहों तोंपर्यंत हें आत्मोद्धरणाचें काम एकदा चुकलें ह्मणजे मग आपल्या स्वाधीन कांहीं नाहीं. लजतदारपणानें अभ्यस्त झालेली वासना अंतकाळीं दत्त म्हणून उभीच असते; मग जशी मति ह्मणजे मनोवासना तशी गति असा कायदाच आहे. पुनरपि मनुष्यतनूमध्यें तरी हा जन्मास येईल असाव कांहीं नियम नाहीं. याबद्दल येथें कोणी हामी घेत नाहीं. आपणच आपल्यास बरें वाईट करणारें आहों. तेव्हां गाफील न राहतां संसाराच्या धुरानें डोळे भरलेले न होऊं देतां, चाललेली सुखरंगाची घडी अशीच राहील या मोहांत न फसतां मनुष्यतनूंतील अवश्य संपादनीय जें आत्मतत्वज्ञान त्याची जोड झाली पाहिजे; पण ती श्रीगुरुकृपेवांचून जोडतां येत नाहीं इत्यादि सर्व मजकूर ध्यानांत घेऊन, आळस टाकून झटकन् उठावें, सावध व्हावें, ब्रह्मनिष्ठ तत्त्ववेत्त्या सिद्ध पुरुषाचा शोध करून त्याचा लाभ करून घ्यावा आणि त्याजपासून तत्वज्ञान समजून घ्यावें, या अभिप्रायानें वेद-पुरुष सर्व अधिकारी जीवांस असा आदेश करीत आहेत कीं,

उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत ।

ह्मणजे आत्मतत्वाच्या यथार्थ ज्ञानानेंच या जीवांस शांति मिळते व

तो कृतकृत्य होतो, म्हणून त्या आपल्या आत्मतत्वाच्या मंगल दर्शनाकरितां अनादि अविद्येंत गाढ झोंप लागलेले हे जीवहो! उठा, उठा, आत्मसंमुख व्हा, चांगले जागे व्हा, आणि सर्व अनर्थास कारणीभूत अशा घोररूप अमंगल अज्ञाननिद्रेचा क्षय करा. तो कसा करावा? असें म्हणाल तर, उत्कृष्ट आचार्यास शरण जा; आणि त्यापासून आत्मतत्वाचें निर्मळ ज्ञान मिळावा, अवश्यमेव हें काम करा, उपेक्षा करूं नका बरें, असा अगदीं मातेप्रमाणें श्रुतिदेवता कृपाळुपणानें यांस उपदेश करीत आहे. हे प्रियतम शिष्यराया, केवल स्वमतीनें तर्क करून याचें ज्ञान प्राप्त होत नाहीं, संप्रदायशुद्ध शास्त्रतत्वज्ञ अशा आचार्यापासून संस्कार पावलेली बुद्धिच निर्दोष ज्ञानास योग्य होते. या आत्मतत्वाचें ज्ञान आचार्यापासून अनन्यपणें संपादित करून, ह्मणजे स्थूलादिक शरीरांपासून तें अत्यंत सूक्ष्म रीतीनें पृथक् अवलोकन करून, हा जीव आनंदास पावतो. पूज्य लोकांपासून आह्मीं असेंच ऐकिलें आहे कीं, ही आत्मविद्या आचार्यापासून समजून घेतली तरच सर्वोत्कृष्ट फल देणारी ती होते. ईश्वराचें ठिकाणीं जशी निःसीमभक्ति, तशीच भक्ति श्रीगुरूवर असेल, तरच हें आत्मतत्त्वज्ञानजन्य आनंदादिक महालाभ प्रतीतीस येतात. अर्थात् श्रीगुरुपदीं निष्ठा पाहिजे, ह्मणजे त्याची कृपा होते, आणि मग शुद्ध ज्ञानोदय होतो. ह्मणून सत्कारपूर्वक आचार्याची उपासना, किंवा सेवा केली पाहिजे ह्मणजे शिष्याचें कल्याण होतें. ऊहापोहकुशल आणि तत्त्वानुभवसंपन्न असे महात्मे लोक ज्ञानोपदेश करतात, परंतु त्यांस शरण गेलें पाहिजे, त्यांच्या कृपेची आशा केली पाहिजे, त्यास निर्मळ बुद्धीनें प्रश्न करावेत, अशा रीतीनें तें ज्ञान शिकावें, तरच तें मिळण्याची खात्री याने धरावी. एवंच कोणतीही विद्या असो, ती गुरुवांचून प्राप्त व्हावयाचीच नाहीं. ती ज्या योग्य गुरुपासून संपादित

कर्तव्य असते, त्याच्याविषयीं अकृपण शुद्धप्रेम, दृढश्रद्धा, निष्कपट नम्रवृत्ति, आणि सर्वप्रकारें संकोचवर्जित सेवाबुद्धि हे चार कायमचे मुख्य सद्‌गुण प्रत्येक विद्यासंपादनेच्छु शिष्याचे ठिकाणीं अवश्य असले पाहिजेत. याशिवाय बुद्धिमत्ता, अभ्यासशीलता इत्यादिक गुण पाहिजे असतात. म्हणजे मग अशा प्रकारचे शिष्यावर गुरुप्रसाद होत असतो. प्रसाद म्हणजे कृपा. आतां गुरूनें प्रसाद करणें म्हणजे काय तर, त्या गुरूनें निष्कपटपणानें, संतोषानें, प्रेमानें आणि उल्हासानें आपल्या शिष्यास उद्दिष्ट विषयाचें ज्ञान देत असणें. युक्तिप्रयुक्तीनें त्याची समजूत घालून देणें; असा एक सर्वमान्य अभिप्राय 'गुरुप्रसाद' या शब्दांतील आहे. याशिवाय दुसराही एक अभिप्राय त्या शब्दांत आहे. तो असा कीं, ' या माझ्या शिष्यभूत अधिकारसंपन्न व आत्मीय जीवास प्रकृत विषयांतील रहस्यभूत तत्त्वें यथार्थपणें एकदाचीं कळोत ' असा मंगल आशीर्वाद गुरूच्या अंतरंगांतून वरचेवर निघत असणें, असे शुभसंकल्प गुरूच्या अंतःकरणांत नित्य स्फुरत असणें असाच मुख्य अर्थ गुरुप्रसाद या शब्दांतील आहे. इकडे शिष्याचेही अंतःकरणांत नेहमीं अशी एक भावना असली पाहिजे कीं, ' मला या अभिलषित विषयाचें ज्ञान यथार्थ, निर्दोष अथवा निश्शंकित असें एकदाचें होवो.' अशा प्रकारच्या गुरुशिष्यसंबंधांत जी विद्या उत्पन्न होते तीच तेजस्विनी असते, ती उभयतांस महाफलप्रद होते, ती त्या उभयतांस सत्कीर्तिसंपन्न करते. अशा तऱ्हेचा गुरुशिष्यसंबंध घडून येणें हें एक या जगांत मोठें आश्चर्यच आहे. कारण तसा योग फार फार दुर्लभ आहे. लौकिक विद्यासंबंधानेंही जर अशा प्रकारचा गुरुशिष्यसंबंध सर्वथा आवश्यक आहे, तर पारमार्थिक जी ब्रह्मविद्या किंवा मोक्षविद्या तिचे संबंधानें तो आवश्यक आहे हें काय सांगावें! अध्यात्मविद्येच्या संबंधानें हें गुरु-

शिष्यांचें नातें किति नाजूक व पवित्र आहे हें एक तशा श्रीगुरूस व तशा साधक सच्छिष्यासच विदित असावयाचें. खऱ्या श्रीसद्गुरूचा आपल्या सच्छिष्यांस असा कळकळीचा निरंतर उपदेश आहे कीं,

यस्मिन्द्यौः पृथिवी चान्तरिक्षमोतं मनः सह प्राणैश्च सर्वैः ।
तमेवैकं जानथ आत्मानमन्या वाचो विमुंचथामृतस्यैष सेतुः॥
तमेव धीरो विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत ब्राह्मणः ।
नानुध्यायाद्बहून् शब्दान्वाचो विग्लापनं हि तत् ॥

ह्मणजे ज्याच्या आश्रयावर स्वर्गादि सर्वलोक, आकाश, पृथ्वी इत्यादि भूतें, सर्व प्राणांसहित मन इत्यादिक तत्त्वें, एकंदरींत सर्व कांहीं पदार्थमात्र अवलंबून असतात, त्या एका आपल्या निर्भयानंदरूप ब्रह्मसंज्ञित, तात्त्विक आत्मस्वरूपासच, हे शिष्य हो ! तुह्मी जाणा ह्मणजे समजून घ्या, त्याचा अनुभव घ्या, आणि सुखी रहा. तद्व्यतिरिक्त समजून घेण्यायोग्य असें दुसरें कांहींच रमणीय नाहीं; जर समजून घेण्यास योग्य किंवा ज्याची ओळख अवश्य करून घेतलीच पाहिजे, असें कांहीं असेल तर तें एक आपलें आत्मतत्त्वच आहे; ह्मणून तेंच समजून घ्यावें. त्याच्या एका लाभांतच सर्व प्रकारची कृतकृत्यता आहे; त्याअर्थी इतर वाङ्मयाचा सोस धरूं नका, आत्मतत्त्वविद्येहून इतर सर्व अज्ञानमय विद्यांचा हव्यास सोडून द्या, तो व्यर्थ श्रम आहे. भयदुःखस्वरूपसंसारमहोदधीच्या पार उतरून अखंड आनंदरूप मोक्षपदास प्राप्त होण्यास हें आत्मतत्त्वज्ञानच एक सेतु ह्मणजे पूल आहे. तुमच्या आत्यंतिक कल्याणाचें हेंच साधन आहे. तेव्हां आतां तें समजून घेण्यास तुम्ही सिद्ध व्हावें. असा वेदशास्त्राकडून तुह्मांस आदेश आहे, असो.

इतक्यावेळपर्यंत आह्मीं काय काय सांगितलें त्यांतील गोषवारा एवढाच कीं, नित्यनिरंतर भयदुःखरहित आनंदस्थितीचा लाभ हाच परमपुरुषार्थ, हाच मोक्ष. तो तर एका आत्मतत्त्वस्वरूपाच्या ज्ञानानेंच

लभ्य आहे. यावरून भयदुःखरूप संसारबंध आत्मतत्त्वाविषयींच्या अज्ञानापासूनच संभवतो. परंतु कोणासही श्रीगुरुवांचून ज्ञान होणें नाहीं, तेव्हां अज्ञानासह तज्जन्य संसारबंधनाचें निवर्तक असें तें आत्मीयस्वरूपाविषयींचें तात्विकज्ञान श्रीगुरुपासूनच मिळविलें पाहिजे. अर्थात् सेवक होऊन अनन्य भावानें त्यास शरण गेलें पाहिजे. इतका वृत्तान्त या भागांत येऊन येथें तो समाप्त होत आहे. पुढील भागांत आत्म्याच्या तात्त्विकस्वरूपाचें सविस्तर आणि सुखप्रतीतिकर असें निरूपण होईल.

प्रथम भाग समाप्त झाला.

गुरुप्रसाद.

द्वितीय भाग.

श्रीगुरूला सच्छिष्यानें शरण जाऊन, त्यापासून अखंड आनंदरूप मोक्षाचे प्राप्तिकरितां ज्या आपल्या आत्मतत्त्वाविषयींचें ज्ञान संपादित कर्तव्य असतें, त्या आत्म्याच्या तात्त्विक स्वरूपाचें लक्षण इत्यादिकांविषयीं आतां विचार सांगणें आहे. तो नीट लक्षांत घ्यावा. आपल्या आत्म्याच्या तात्त्विक स्वरूपाचें लक्षण अनेक शब्दप्रकारांनीं सांगतां येतें. तथापि सत्, चित्, आनंद हे शब्द तर फारच मुद्याचे आहेत. अगोदर ह्याच शब्दांचे द्वारा आत्म्याचें तें तात्विक स्वरूप व लक्षण ध्यानांत घेतलें पाहिजे. तो सच्चिदानंदस्वरूप किंवा सच्चिदानंदस्वभाव असाच आहे. ज्ञान हा पदार्थ तद्रूप स्थिति होण्याचे मार्गांतील एक अचुक खूण किंवा लक्षण आहे, ह्मणजे 'ज्ञान' या शब्दापासून जी ज्ञानरूप अर्थव्यक्ति समजण्यांत येते, ती तर आपल्या सच्चिदानंदस्वरूप तात्विक आत्मवस्तूची एक सर्वगत अक्षय्य विकासमान प्रभाच आहे. भूमंडलावर फाकलेल्या प्रभेवरून गगनमंडलांत अत्युच्च स्थानीं असलेल्या दिनमणीचें तेजोरूप बिंब जसें आपल्याला लक्षांत आणतां येतें; त्याचप्रमाणें या ज्ञानरूप प्रभेवरून तात्विक सच्चिदानंदरूप आत्मबिंबांत मनोगतीचा ह्मणजे लक्षाचा प्रवेश होऊं शकतो. शुद्धरूप आत्मबिंबीं प्रवेश करून देण्यास ज्ञान या अर्थाचा वाचक जो 'ज्ञान' असा हा शब्द, तोच फार उपयोगी आहे. हें आह्मी उघडपणें सांगत आहों, वस्तुतः तसें सांगणें योग्य नाहीं कारण तें गुह्य आहे. असो; नीट विचार करून असें लक्षांत घ्यावें कीं, आपल्या ह्या शरीररूप पिंडांत 'ज्ञान' या शब्दानें वापरली

जाणारी अशी कोणी एक वस्तुव्यक्ति आहे. ती सर्वथा आहेच आहे. ती कबूल झालीच पाहिजे. ती नित्य आहे. म्हणजे त्रिकाळीं विद्यमान आहे, असेंही पण कबूल झालेंच पाहिजे. कारण, काल, देश, आणि कार्यकारणसंबंधयुक्त असे सर्व स्थूल, सूक्ष्म, पदार्थ; त्याचप्रमाणें अनंत गुण, धर्म, अवस्था, इत्यादिक सर्व पदार्थांचा आपल्या अंतःकरणांत जो निरंतर कांहींना कांहीं कसाबसा तरी एक उल्लेख होत असतो याचें तत्वतः कारण काय असलें पाहिजे, याचा कोणीही विचार करून पाहील तर तो हेंच सांगणार कीं, कोणी एक ज्ञानसंज्ञित प्रकाश येथें आहे, तो निरंतरचा सिद्ध आहे. तो नाहीं असें ह्मणतांच येणार नाहीं. तसें बोलावयाचें मनांत आणणें हें देखील अशक्य आहे. 'ज्ञान' ह्मणून कांहीं एक चमत्कारिक प्रभा आपल्या अंतर्यामांत कशी स्वयमेव सदैव सिद्ध आहे हें निदर्शनास आणून देण्याकरितां व्यवहारांत मनुष्य बोलतांना जीं वाक्यें बोलत असतो तशीं तीं थोडींशीं आह्मी येथें बोलून दाखवितों. "आतां मला झोंप येत आहे. रात्रीं अगदीं थोडी झोंप आली होती. मला भूक लागली आहे. काल माझे पोटांत दुखत होतें. दोन दिवसांपूर्वीं मला भोंवळ करीत होती, मळमळत होतें, चैन पडेना. कोणी कांहीं म्हटलें कीं त्रास वाटावा. स्वप्नें वाईट पडल्यानें भय वाटतें; व अंतःकरण उद्विग्न होतें. आपण जो अंदाज करीत असतों तो नेहेमीं बरोबरच ठरतो असें नाहीं. कांहीं गोष्टी आपल्या बुद्धीच्या आटोक्यांत येतात, पण पुष्कळच गोष्टी तिच्या आटोक्याचे बाहेर आहेत. केलेल्या वाईट कर्मांची आठवण झाली ह्मणजे दुःख होतें. चांगल्या कर्मांची आठवण झाली असतां समाधान होऊन धीर वाटतो. विस्मृति होते हें एक बरेंच आहे. मनाजोगें झालें ह्मणजे संतोष वाटतो. पोरपण खेळण्यांत गेलें. तारुण्यात विषयांध झालों. आणि आतां साठी

येऊन बुद्धि नाठी होण्याचा समय आला तरी अहंता कायमच." असो. इत्यादिक वाक्यांवरून या वक्त्याच्या अंतर्यामांतील प्रत्येक निरनिराळा भाव त्याचे पुढें उघडकीस येतो, त्यावरून प्रत्येकाच्या अंतर्यामांत 'ज्ञान' ह्मणून कोणी एक नित्य स्फुरद्रूप आणि सर्वभासक असा प्रकाश अखंडपणानें द्योतमान आहे, चमकत आहे, स्फुरत आहे असें अगदीं धडधडीतपणें प्रत्येकास कबूल झालेंच पाहिजे; त्यास नाकबूल करण्याइतका लबाड या जगांत कोणीही असूं शकणार नाहीं. पण आतां इतकीच कृपा करावी कीं, त्या ह्या ज्ञानसंज्ञित प्रकाशास चर्मचक्षूंनीं पाहण्याचें मात्र मनांत योजूं नये. बुद्धीनें पाहिजेल तर आपणच त्यास दृश्य होऊन त्याच्या एकांग अधिष्ठानावर तत्स्वरूपसत्तेचा निश्चय धरून त्यांत समाप्त व्हावें ह्मणजे मिळविली. यांतच सर्वांना नित्य अपेक्षित असलेलें हृदयंगम असें समाधानाचें धाम सांपडणारें आहे. तत्त्वतः गुरुप्रसाद तो हाच होय.

ह्या ज्ञानसंज्ञित स्वयंप्रकाशरूप वस्तूस 'भान' असेंही प्रायः ह्मणतात. अगदीं प्राकृत भाषेंत सांगणें झाल्यास, त्यास 'जाणीव' या शब्दानेंच समजतां येईल. कधीं कधीं तर त्यास 'स्फूर्ति किंवा स्फुरण' असेंही म्हणतात. चैतन्य हें तर त्यास प्रसिद्धच नांव आहे; ज्ञप्ति, दृक्, दृष्टि, चिति, चित्, अशाही त्यास दुसऱ्या अनेक योग्य संज्ञा आहेत. संवित् हाही एक त्यास संकेत आहे. श्रीमद्विद्यारण्यमुनीनीं आपल्या पंचदशीनामक जगत्प्रसिद्ध ग्रंथांत अगदीं पहिल्या तत्त्वविवेकरूप प्रकरणांतील प्रथमच्या सात आठ श्लोकांत ह्याच ज्ञानकलेचें किंवा संवित्कलेचें वर्णन करून तिचें स्वतःसिद्ध आस्तित्व दाखविलें आहे. एखाद्या भाग्यवंत मुमुक्षूचें तर सर्व समाधान तेवढ्या श्लोकांतही होण्याजोगें आहे. याकरतां कोणत्याही मुमुक्षु साधकानें निदान तेवढे श्लोक तरी चांगले मननपूर्वक अवश्य एकवार पाहावेत अशी त्यास आमची

अगत्यानें शिफारस करतों. आह्मी देखील ते श्लोक येथें सांगत आहोंच, पण अर्थ मात्र तात्पर्यरूपानें बोलूं. ते नित्यस्मरणीय श्लोक असे—

शब्दस्पर्शादयो वेद्या वैचित्र्याज्जागरे पृथक् ॥
ततो विभक्ता तत्संविदैकरूप्यान्न भिद्यते ॥१॥
तथा स्वप्नेऽत्र वेद्यं तु न स्थिरं जागरे स्थिरम् ॥
तद्भेदोऽतस्तयोः संविदेकरूपा न भिद्यते ॥२॥
सुप्तोत्थितस्य सौषुप्ततमोबोधो भवेत्स्मृतिः ॥
सा चावबुद्धविषयाऽवबुद्धं तत्तदा तमः ॥३॥
स बोधो विषयाद्भिन्नो न बोधात्स्वप्नबोधवत् ॥
एवं स्थानत्रयेऽप्येका संवित्तद्वद्दिनान्तरे ॥४॥
मासाब्दयुगकल्पेषु गतागम्येष्वनेकधा ॥
नोदेति नास्तमेत्येका संविदेषा स्वयंप्रभा ॥५॥
इयमात्मा परानंदः परप्रेमास्पदं यतः ॥
मा न भूवं हि भूयासमिति प्रेमात्मनीक्ष्यते ॥६॥
इत्थं सच्चित्परानंद आत्मा युक्त्या तथाविधम्
परं ब्रह्म तयोश्चैक्यं श्रुत्यंतेषूपदिश्यते ॥७॥

यांतील भावार्थ असा कीं, जागृदवस्थेमध्यें शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध अशा पंच विषयांचा उल्लेख होत असतो, तो आपल्या अंतर्यामांत संवित् ह्मणजे कोणी एक नित्य जीवंत जाणीव कळा आहे ह्मणून होतो; ती असल्यावांचून तो उल्लेख होणार नाहीं, असें अगदीं उघड आहे. ते हे विषय परस्परांहून भिन्न जरी असतात, तरी ते जीच्यायोगानें आपणांस ज्ञात होतात किंवा उल्लेखास येतात, ती जाणीव स्वतः अगदीं एकरूप आहे. 'स्वप्नकालांतही असाच प्रकार आहे, म्हणजे त्यांतही हे शब्दादिक विषय उल्लेखास येतात, त्या अर्थीं तेथें पण ही जाणीवकळा आहेच, किंवा असलीच पाहिजे' असें

अगदीं उघड ठरतें. येथें अशी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, जागृत्कालची जाणीव आणि ती स्वप्नकालची जाणीव दोन नाहींत, तर अगदीं एकच आहे. ह्मणजे विषय पृथक् पृथक् असून तद्विषयीं जाणीव जशी अगदीं एकरूप आहे, त्याप्रमाणें अवस्था भिन्न भिन्न, किंवा काल भिन्न भिन्न झाला तरी सर्वांचा उल्लेख करून देणारी जाणीवकळा एकच आहे हें अगदीं न्याय्य आहे. आतां ज्याअर्थी निद्राकालीं देखील सुखाचा उल्लेख आहे, व शब्दादिक विषयांचा उल्लेख नाहीं, ह्मणजे त्यांच्या अभावाचा उल्लेख आहे, अर्थात् प्रशांत सुख आणि विषयसंपर्काचा तो अनुल्लेख हे दोन अंश सिद्ध होतात, त्या अर्थी त्यावेळीं जिच्यायोगानें त्या दोहोंची सिद्धि होते, अशी जाणीवकळा तेथेंही आहे हें अगदीं निश्चित आहे; आणी ती जाणीव, जागृति व स्वप्न या दोन कालांतील जाणीवेहून भिन्न नाहीं, असें पूर्वीच्या न्यायानेंच उघड ठरतें. एवंच, अशा तीन अवस्थांमध्यें किंवा तीन काळांमध्यें जर ही अभिन्न अशी एकरूपच जाणीव आहे, तर ती नित्य व अखंड आहे असें पण सिद्ध होतें. आतां जर आजच्या सबंद दिवसाच्या तीन अवस्थांभर ही जाणीव एकच अखंड आहे, तर आजच्या दिवसाच्या पूर्वीच्या सर्व दिवशीं व पुढील सर्व दिवशीं ही जाणिव अशीच एक अखंड असली पाहिजे. माळेच्या प्रत्येक मण्यांत जसा एकच तंतु ओंवलेला असतो, त्याप्रमाणें कालत्रयाचा उल्लेख देणारी ही जाणीवकळा त्या सर्वकालत्रयांत सर्वतोमुख व्यापून बसलेली आहे असें म्हटलें पाहिजे. ही जाणीवकळा किंवा जाणतीकळा आपल्या एका देहपरिमित देशांत जशी आहे तशीच ती सर्व देशांत भरून, व्यापून अशी नित्य ठाण मांडून आहे असेंही समजलें पाहिजे. ह्मणजे अमुक देशांतच ही जाणीवकळा आहे आणि अमुक देशांत नाहीं, अशी ती नाहीं.

ती सर्व देशांस आंत बाहेर व्यापून आहे असें ठरलेंच पाहिजे. ही जाणीवकळा आपल्या एका देहवस्तुमध्यें जशी आहे, तशी ती सर्व वस्तुमध्येंही आहे. ह्मणजे भावार्थ हा कीं, ही जाणीवकळा सर्व देशकालवस्तुव्यापक आहे, असें सप्रत्यय सिद्ध होतें. अर्थात् ही जाणीवकळा स्वयंसिद्ध किंवा स्वयंप्रकाशरूप आहे असेंही कबूल केलें पाहिजे. कारण, या जाणीवकळेच्या योगानेंच जर इतर सर्व कांहीं सिद्ध होणार, उल्लेखास येणार, तर तिची सिद्धि करील असें दुसरें कोण असणार? जर तीच सर्वांस प्रकाशित करणार तर तिला प्रकाशित करण्यास दुसरा कोणता प्रकाश असणार? ह्मणून ती स्वयंसिद्ध, किंवा स्वयंप्रकाश आहे असें अगदीं ओघानेंच सिद्ध होतें. शेवटीं रहस्य सांगावयाचें आहे तें इतकेंच कीं, ' आत्मा आत्मा ह्मणून जी कोणी एक वस्तु समजावयाची आहे ती हीच जाणीवकळा; आणि वेदशास्त्रादिकांचें प्रतिपाद्य ठरलेलें 'ब्रह्म ब्रह्म' ह्मणून जी कांहीं एक वस्तु, ती तरी हीच जाणीवकळा होय. या अभिप्रायाचा एक सदा स्मरणीय अनुष्टुप् श्लोक आहे; तो असा कीं,

ज्ञानमेकं सदा भाति सर्वावस्थासु निर्मलम् ॥
मन्दभाग्या न जानंति स्वरूपं केवलं बृहत् ॥

याचा अर्थ असा कीं, ज्ञान ह्मणून एक स्वतः सिद्ध वस्तु सर्वत्र सर्वदा जागृत्यादि बाल्यादि इत्यादिक सर्व अवस्थांमध्यें ओतप्रोतपणें प्रकट प्रकाशमान आहे. तें ज्ञान निर्मल आहे, ह्मणजे त्याच्या योगानें ज्या ज्ञेयभूत अनंत पदार्थांचा उल्लेख होतो त्या पदार्थांच्या प्रचंड गर्दींत तें व्यास असूनही आपली अलिप्तता निरंतर कायम ठेवतें. मौज अशी कीं, तें प्रत्येक पदार्थाकार वृत्तीच्या रूपानें नटत असूनही त्या त्या आकारास शिवत देखील नाहीं. पदार्थांची सिद्धि ह्मणजे उल्लेख होतांना हें ज्ञानमय वस्तु वृत्तीच्या द्वारें त्या त्या आकाराचें

बनतें असें म्हटल्यावांचून सोय नाहीं. कारण नाहीं तर, तत्तत्पदार्थाचें ज्ञान म्हणून कांहीं एक जिन्नसच नाहीं असें होणार. पण हें ज्ञान त्या त्या पदार्थांत जर कालवलें जातें असें म्हणावें तर वेगळेपणानें पदार्थाचा उल्लेख होऊं शकणार नाहीं. यावरून हें ज्ञानाख्य वस्तु सर्व पदार्थांत ओतप्रोत असूनही असंगरूप असतें, म्हणून हें सहज निर्मल आहे असें ठरतें. कोणत्याही पदार्थानें तें लिडबिडित होत नाहीं. किंवा बरबटत नाहीं. जर तें तसें होणारें असेल तर 'पदार्थ' म्हणून कोणासही कांहीं उल्लेखास येणार नाहीं; सर्व अंधकार होऊन जाईल. सारांश, हें ज्ञानाख्य वस्तु स्वतःसिद्ध स्वयंप्रकाश नित्याखंडरूप असून स्वभावनिर्मल असें तें आहे; आणि हेंच **स्वरूप**, म्हणजे आपलें तात्विक आत्मसंज्ञित वस्तु होय; त्याचप्रमाणें याच ज्ञानरूपवस्तूस **बृहत्** असें म्हणतात; म्हणजे ब्रह्म म्हणून जी कांहीं वस्तु, ती तरी हीच ज्ञानसंज्ञित वस्तु आहे. ही आत्मसंज्ञित किंवा ब्रह्मसंज्ञित ज्ञानरूप वस्तु आपल्या येथें अगदीं सहज स्वाभाविक नित्य अखण्ड आहे. असें जरी आहे, तरी पण भाग्यहीन जीवास हें रहस्य समजूतींत येण्याचा योगच अगोदर दुर्मीळ. तशांत तो योग आला तरी हेंच तें आत्मीयतत्व किंवा हेंच तें परब्रह्मतत्व म्हणून हृदयांत अनन्यपणें निश्चय बाणून जाणें म्हणजे कठिणच गोष्ट आहे, कांहीं केल्या हा उपदेश पटतच नाहीं. कारण त्याच्या मनानें असें घेतलेलें असतें कीं, ब्रह्म असें कुठें वाटेवर थोडेंच पडलेलें आहे, तें असें सहज फुकटांत सांपडणारें कोठचें असणार. ईश्वराची कृपा होईल तेव्हां तें परब्रह्म मिळणार, उगीच गोष्टी बोलून काय अर्थ आहे हो! असा हा गतानुगतिक अंधलोकप्रवाद मनांत आणून तत्ववादी भक्तवर्य तुकोबारार्य असें म्हणतात कीं,

जरी हा हो कृपा करील नारायण। तरी हेंची ज्ञान ब्रह्म होय॥
कोठेमिया कांहीं नलगे आणावें। नलगे कोठें जावें वराकया॥

जरी देव कांहीं धरिल पैं चित्तीं ॥ तरिच हे होती दिव्य चक्षू ॥
तुका म्हणे देव दावील आपणा ॥ तरी जीवपणा ठाव नाहीं ॥
ज्ञान सकळाठायीं आहे हें तों साच ॥भक्तिवीण तेंच ब्रह्म नोहे ॥

खरोखर परमेश्वराची कृपाच जर होईल, तर हेंच ज्ञान, ब्रह्म म्हणून एकदाचें पटेल. हेंच ज्ञान म्हणजे कोणतें, याजविषयीं पूर्वी उल्लेख करण्यांत आलाच आहे. अर्थात् सर्वत्र सर्वदा कोणत्याही पदार्थाचा उल्लेख करून देणारें जें आपल्या पिण्डांत कोणी एक वस्तु नित्य निरंतर प्रकट आहे, त्यासच ज्ञान असें म्हणावें व तेंच परब्रह्म, तेंच निजात्मतत्व, हेंच पारमेश्वरी शुद्धरूप, अशी ही खूण पटणें म्हणजे ईश्वराचा अनुग्रहच झाला म्हणावयाचा. सारांश, आपल्या ब्रह्मात्मस्वरूपसिद्धिसाठीं कोठून कांहीं आणावें लागत नाहीं. किंवा या संसारसमुद्रास तरून जाण्यासाठीं कोठें जावेंही लागत नाहीं. ईश्वरानें जर कांहीं याचें कल्याण करण्याचें मनांत धरलें तर हीच याची बुद्धि किंवा दृष्टि दिव्य होईल. अर्थात् सुदैवानें या जीवाच्या येथें बुद्धींत हा शास्त्रोपदेश जर एकदाचा बिंबला तर दिव्यदृष्टि ती आणखी कोणती वेगळी आहे! किंवा ईश्वरीय अनुग्रह तरी याहून दुसरा कोणता एवढा मोठा स्पृहणीय आहे! एवंच विश्वासानें आणि प्रत्ययानें जर एवढी खूणगांठ यानें पक्की बांधून ठेवली, जर आज सिद्ध असलेलें ज्ञानसंज्ञित वस्तुच आपलें परब्रह्मसंज्ञित आत्मतत्वस्वरूप म्हणून यानें अनन्य प्रेमानें मुळांत असलेलें हृदयांत ओळखीनें धरून ठेवलें, तर मग जीवदशेंतील दैन्यदुःख काय म्हणून राहील? यास तें असंग व अखंडानंदरूप मुक्तिपद कां मिळणार नाहीं? हा तर तसा सहज मुक्तच आहे. पण जर कोणी दयाळूपणानें या जीवास असें सांगितलें कीं, अरे तुझ्यामध्यें आतां उघड सिद्ध असलेली, निवळ जीवंतपणाची खूण, अशी जी केवळ जाणीवकळा, हीच तुझी आत्मवस्तु,

अरे हीच सर्वांची निरतिशयप्रिय आत्मभूत परब्रह्मवस्तु. ब्रह्म किंवा आत्मतत्व याहून दुसरें असें कांहीं नाहीं, असें शतशः जरी बजावून सांगितलें तरी या करंट्यास तें खरेंच वाटत नाही. येथें कोणी काय करावें !!! असो, आत्मा म्हणजे तत्वतः काय परमगुह्य वस्तु आहे, त्याची लक्षणस्थिति इत्यादि आम्हीं 'ज्ञान' या शब्दार्थाच्या रूपानें इतका वेळ सविस्तर सांगितली. 'सत् चित् आनंद' हे शब्द तशा आत्मस्वरूपाचे सर्वथा लक्षक आहेत. त्यांतील 'चित्' याचा अर्थ 'ज्ञान' असा आहे. ह्मणून ज्ञानकला किंवा जाणीवकळा अशा अनुरूप संकेतांनेंच ती आत्मवस्तु आह्मीं असंकोच कळविली आहे. तथापि आपल्या या आत्मवस्तूचें तात्विक लक्षण प्रत्यक्ष वेदपुरुषांनींच तसें सांगितलें आहे; तें त्यांचें वाक्यच आम्ही पुढें मांडतों.

सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म ।

हें वाक्य तर अतिप्रसिद्ध आहे. या वाक्यांत ब्रह्माचें स्वरूपलक्षण सांगितलें आहे. कोणी असें ह्मणेल कीं, प्रस्तुत आत्मवस्तूचें स्वरूप, लक्षण इत्यादिकांचा विचार चालला असतां मध्येंच हें वाक्य देऊन ब्रह्माचें स्वरूपलक्षण सांगण्याचा काय संबंध आहे ? या प्रश्नाचें इतकेंच उत्तर कीं, ज्या आत्मवस्तुतत्त्वाच्या लक्षणादिकांचा विचार सध्यां चालला आहे त्यालाच ब्रह्म असा एक दुसरा संकेत आहे. आत्मा आणि ब्रह्म या दोन्ही शब्दांतील अर्थतत्त्व अगदीं एक आहे, या आत्म्यासच ब्रह्म असें ह्मणावें व समजावें या अभिप्रायानेंच '**अयमात्मा ब्रह्म**' म्हणजे हा आत्माच ब्रह्म आहे, असें एक वेदमहावाक्य आहे. आत्मा म्हणजे व्यापक, आणि ब्रह्म म्हणजे अतिविस्तृत, असा त्यांतील व्युत्पत्तिसिद्ध अर्थ आहे. यावरून दोन्ही अर्थांतील रहस्य एकच असणार. अर्थात् ब्रह्माचें जें लक्षण, तेंच आत्मवस्तूचेंही लक्षण असावयाचें हें अर्थातच सिद्ध होत आहे. तेव्हां आतां या ब्रह्मसंहित

आत्मवस्तूचें स्वरूपलक्षण काय आहे ? असें विचारणारास उत्तर हेंच कीं, जें सत्य, म्हणजे त्रिकालीं एकरूपानें विद्यमान, अनंत म्हणजे नाशरहित, किंवा देशकालवस्तुपरिच्छेदरहित; त्याचप्रमाणें जें ज्ञानरूप, म्हणजे जें केवळ साक्षात् ज्ञानच, त्यास परब्रह्म किंवा आत्मा असें समजावें. पूर्वोक्त ब्रह्मात्मवस्तूच्या स्वरूपलक्षणादिकांचें प्रतिपादक जें ' सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म ' असें प्रसिद्ध वाक्य, त्यांतील पदांचा थोडासा विचार करूं. हें ब्रह्मात्मवस्तु सत्यस्वरूप आहे, ज्ञानस्वरूप आहे, आणि अनंत म्हणजे देश—काल—वस्तु—परिच्छेदरहित आहे. म्हणजे हें ब्रह्म किंवा आत्मवस्तु अमुक देशांतच, अमुक कालांतच आणि अमुक पदार्थीतच आहे, व अमुक देशांत, अमुक कालांत, किंवा अमुक पदार्थीत नाहींच, असें तें नाहीं. तें सत्य आहे याचा अर्थ असा कीं, ज्या रूपानें जें निश्चित, ज्यांत कधीं व्यभिचार होत नाहीं, त्यास सत्य असें म्हणावें. आणि जें ज्या रूपाचें निश्चितसें होऊन व्यभिचार पावतें, त्यास अनृत किंवा मिथ्या म्हणावें. उदाहरणार्थ मृत्तिका सत्य; पण नामरूपात्मक व विकाररूप जो घट तो मिथ्या, तो अनृत. कारण, तो घट पूर्वी नसतो. फुटल्यावर नसतो, म्हणून अनृत ठरतो. पण मृत्तिका घटाच्या उत्पत्तीचे अगोदर, त्याच्या नाशाचे अनंतर, आणि त्याच्या विद्यमान दशेंतही एकसारखी असतेच असते, म्हणून ती मृत्तिका सत्य ठरते. त्याप्रमाणें सत् म्हणजे अस्तित्वरूप किंवा सत्तार्थक वस्तुस्वरूप, तेंच सत्य. पण तें मृत्तिकेप्रमाणें जडरूप नाहीं, हें प्रदर्शित करण्याकरितां ' ज्ञान ' हें पद योजलेलें आहे. म्हणजे हें ब्रह्मात्मवस्तु ज्ञानस्वभाव किंवा ज्ञानस्वरूप आहे; अर्थात् तें चैतन्य आहे. या वाक्यांत ज्ञान हें पद केवळ भावरूप आहे. म्हणजे नुसतें असणें इतक्याच अर्थाचें तें आहे. म्हणजे पुनः असें तें सत्यस्वरूप

आहे, तसें तें ज्ञानस्वरूपही आहे. तात्पर्य, तसें म्हटल्यानें तें ब्रह्म कर्तृत्वादिक कारकस्वरूप नव्हे, विकारी नव्हे, जडरूप नव्हे; वस्तुतः तें ज्ञातृस्वरूपही नव्हे, आणि ज्ञेयरूप तर मुळींच नव्हे. हें ब्रह्मात्मवस्तु ज्ञेयरूप होईल तर घटादिपदार्थतुल्य तें होईल, ज्ञातृरूप होईल तर विकारी होईल, एतावता तें अंतयुक्त होईल. केवळ भावरूप असें ज्ञानमात्रच तें आहे, असें म्हटल्यानेंही तें अंतयुक्त ठरतें, असें जर कोणी म्हणेल, तर तें तसें नाहीं हें दर्शित करण्यासाठीं ' अनंत ' हें विशेषण या ब्रह्मात्मवस्तूस दिलें आहे. ' अनंत ' या पदाचा अर्थ पूर्वीं सांगिलाच आहे. आकाशादिक तत्त्वें सापेक्ष व्यापक आहेत, पण ब्रह्मात्मवस्तु निरपेक्ष, निरतिशय व्यापक आहे. ब्रह्म म्हणजे आत्मा; आत्मा म्हणजे स्वरूप, त्यासच ज्ञान असें म्हणणें आहे. यद्यपि उपाधिपरत्वें आणि ज्ञेयपदार्थांच्या सापेक्षतेनें या भावात्मक ज्ञानरूप अशा स्वरूपभूत आत्म्यास ' ज्ञाता, साक्षी ' असें म्हणण्याचा संप्रदाय आहे, तथापि ज्ञातृत्व हें त्या ज्ञानाख्य स्वरूपावांचून कांहींच बनत नाहीं, म्हणून हें केवळ ज्ञानरूप आत्मवस्तु तशा ज्ञातृभूत किंवा साक्षीभूत जीवात्म्याचेंही परम तात्विक स्वरूप आहे. जीवात्मा म्हणून ज्याचा या शरीरांत प्रवेश सांगितला आहे, तो या ब्रह्मात्मवस्तूचाच आहे, म्हणून या शरीरादिक उपाधिपरत्वें त्यास भोक्ता, जीवात्मा, ज्ञाता, साक्षी असें म्हणणें आहे. एरवीं उपाधिसंबंध वजा करून पाहतां, तो ज्ञातृरूप जीवात्मा केवळ भावरूप ज्ञप्तिमात्रच आहे. एकंदरींत ज्ञानमात्र जें ब्रह्म, तेंच ज्ञात्याचें वास्तविक स्वरूप आहे, तें निरंतर एकरस आहे. आतां शब्दादिविषयासंबंधी असें ज्ञान उत्पन्न होत असतें, म्हणजे ज्ञान म्हणून एक उत्पन्न होणारी वस्तु आहे, असें जें कचित् म्हणणें येतें, तें केवळ अविवेकिदृष्टीचें आहे. म्हणजे मुख्य उपाधिरूप जी बुद्धि, ती इंद्रियद्वारा

विषयाच्या आकारासारखी परिणाम पावते, तेव्हां तिचे शब्दादि-रूप अवभास होत असतात, ते मात्र उत्पन्न होतात, त्यास ज्ञान असें व्यवहारांत ह्मणतात; पण हें ज्ञान वृत्तिरूप किंवा परिणामरूप आहे, म्हणजे सन्मात्र स्वरूपभूत असें तें नाहीं. तेंही इतर विषयां-प्रमाणें एक विषयरूपच आहे. तें हें अवभासरूप किंवा वृत्तिरूप अथवा विषयभूत ज्ञान, त्या ब्रह्मसंज्ञित शुद्ध ज्ञानमात्रस्वरूप अशा आत्म्यास गोचर होणारें असें आहे. तें आत्म्यावरील आगंतुक धर्म (वस्तुतः तो बुद्धिधर्म आहे) म्हणून उत्पन्न होणारें असें विकार-रूप ठरतें. परंतु ब्रह्मसंज्ञित, आत्मस्वरूपभूत नित्याखंड अशा स्वयंप्रका-शरूप ज्ञानाची कांहीं ती उत्पत्ति नव्हे. अर्थात् हें उत्पन्न होणारें वृत्तिरूप किंवा परिणामभूत ज्ञान आणि तें नित्यस्वभावसिद्ध शुद्धरूप चिन्मात्र असें स्वयंभु स्वरूपभूत ज्ञान, अशा या दोहोंतील इतका हा विवेक साधारण लोकांस होत नाहीं. असो, ब्रह्मसंज्ञित हें ज्ञप्तिस्वरूप आत्मतत्ववस्तु ज्ञानशब्दाचें वाच्यार्थरूप नव्हे, तरी पण ज्ञान अशा शब्दावरून तें सर्वदा लक्षित होत असतें, म्हणजे ज्या 'ज्ञान' अशा शब्दानें तें लक्षित करावयाचें आहे, तो ज्ञान हा शब्द, बुद्धीचा धर्म-ह्मणून शोभणारा आणि केवल स्वरूपभूत अशा ब्रह्मसंज्ञित ज्ञानात्मक चै-तन्याच्या आभासाचा वाचक होणारा असा आहे. ह्मणजे तो त्या शुद्धचि-न्मात्ररूप स्वरूपभूतज्ञानाचा वाचक नव्हे. कारण, शब्दाची प्रवृत्ति होण्यास प्रायः जाति, गुण, धर्म इत्यादिक गोष्टी पदार्थामध्यें असाव्या लागतात, त्या कांहीं या ब्रह्मसंज्ञित चैतन्यैकरस अशा ज्ञानरूप आत्मवस्तूमध्यें विचारदृष्ट्या नाहींत, म्हणून तेथें कोणताच शब्द वाचकपणानें लागू होत नाहीं. त्याचप्रमाणें सत्य हा शब्द देखील ब्रह्मवस्तूचा लक्षक आहे, वाचक नव्हे. कारण, वास्तविक ब्रह्मरूपवस्तुस्थितींत कोणताही नामरूपाकार असा विशेष नाहीं. तेव्हां तो सत्य असा शब्द

त्या ब्रह्माचा वाचकच आहे असा प्रकार नाहीं; किंवा तें त्याचा अर्थरूपच आहे असेंही नाहीं. यावरून या सत्य अशा शब्दाचा विषय सामान्य बाह्यसत्ताच आहे. असो, ‘ सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म ’ या वेदवाक्यांतील पदांचा हा थोडासा शास्त्रीय विचार आम्हीं सांगितला याचें चांगलें मनन केलें पाहिजे. एवंच आपल्या आत्म्याच्या तात्विकस्वरूपाची ओळख होण्यास आपल्या पिण्डांतच प्रकटपणानें नित्य निरंतर व स्वयंसिद्ध असणारा जो हा ज्ञानरूपी प्रकाश आहे तो अगोदर लक्षांत धरावा म्हणजे मग आत्म्याच्या त्या गंभीर अंतर्यामांत प्रवेश घडेल. अर्थात् हा साधक कृतकृत्य होईल.

या आत्म्याचे लक्षणभूत ज्ञानसंज्ञित वस्तूस प्रकाश (उजेड) असें ह्मटल्यानें सूर्याचें उन्ह, चंद्राचें चांदणें, अग्नीचा धगधगीत जाळ नक्षत्रांची लुकलुक, विद्युल्लतेचा लखलखाट, काजव्याची चुणुक इत्यादि प्रकारचा कांहीं एक भास आपल्या किंवा जगाच्या सर्वांगभर रसरसून राहिला आहे असें न समजावें; किंवा यास ‘ ज्योति ’ असें ह्मटल्यानें तरी दिव्याच्या ज्योतिसारखा कांहीं एक प्रकार आहे असेंही समजूं नये. आपण कधीं कधीं असें बोलतों कीं, मला अमुक गोष्ट समजली, अर्थात् ती समजली ह्मणजे तिचा प्रकाश झाला किंवा तिचेविषयीं आपल्या बुद्धींत उजेड पडला असा अर्थ आहे; ह्मणजे पण सूर्यचंद्रादिकांच्या प्रकाशासारखा तो प्रकाश किंवा उजेड आहे असा मुळींच आपला कोणाचाही अंतर्गत भाव नाहीं. मात्र या सूर्यचंद्रादिकांचे प्रकाश बाह्यपदार्थांच्या प्रकटतेस निमित्त आहेत ह्या अर्थसाम्याचे दृष्टीनें आपल्या अंतर्यामांतील स्वतःसिद्ध ही ज्ञानकला किंवा चित्कला पाहिजेल तशा वस्तुस्थितीची प्रसिद्धि किंवा उघडकी होण्यास सर्वथा कारण आहे, म्हणून तिला प्रकाश असा संकेत योजिला आहे. तथापि स्वयंसिद्ध, शुद्ध, केवळ

अशा ज्ञान या अभिप्रायानें प्रकाश, ज्योति, दीप, भास, प्रभा असे शब्दही कोठें कोठें शास्त्रांत आढळतात. मण्डलब्राह्मणोपनिषदांत तर 'प्रकाश' अशा शब्दानें बरेंच त्याविषयीं वर्णन आहे. एरवीं पुढील प्रकाशार्थक वाक्यें तर अत्यंत प्रसिद्ध आहेतच.

तच्छुभ्रं ज्योतिषां ज्योतिः। अत्रायं पुरुषः स्वयंज्योतिः।
यस्य भासा सर्वमिदं विभाति तमेव भांतमनुभाति सर्वम् ॥
आदित्यवर्णं भारूपः। ज्ञानालोकं समंततः।
प्रकाशरूपोऽहमजोऽहमद्वयोऽसकृद्विभातोऽहमतीव निर्मलः ॥

ह्मणजे हें ब्रह्मात्मवस्तु शुभ्र आहे, सर्व ज्योतींचेंही ज्योति तें आहे. अर्थात् येथें हें सर्व पदार्थांत भरलेलें स्वयमेव ज्योतिरूप, अत्यंत प्रकट, किंवा स्वयंप्रकाशमान असें तें आहे. त्याच्या भासानेंच हें सर्व जगत् भासत आहे. तें सर्वांच्या अगोदर कधींपासूनच प्रकाशमान होऊन राहिलें आहे. त्याच्या योगानें त्याच्यामागून मग हें सर्व जगत् भासूं लागतें. असें तें परब्रह्म सूर्याप्रमाणें लखलखित प्रभारूप आहे. हा ज्ञानरूपी त्याचाच उजेड आसमंतात् भरला आहे. असें तें अत्यंत निर्मल प्रकाशरूप आहे. ही ब्रह्मात्मवस्तु ह्मणजे एक विलक्षण ज्योतिच आहे, तें ब्रह्म म्हणजे एक अलौकिक तेज आहे. त्या या तेजोरूप ब्रह्मात्मवस्तूंतीलच थोडेंसें तेज या आपल्या सूर्य, चंद्र, अग्नि, विद्युत्, ग्रह, तारे, इत्यादिकांत अंशतः अंशतः आलें आहे. सूर्यचंद्रादिक जसे प्रकाशरूप आहेत, ह्मणून सर्वांस प्रकाशक होऊन राहिले आहेत. त्या न्यायानें अनंत ब्रह्माण्डांना प्रकाशित करणारें हें ब्रह्मात्मवस्तु किती तरी प्रकाशरूप असलें पाहिजे. पण हें प्रकाशस्वरूप आहे असें ह्मटल्यानें, तो प्रकाश भौतिक नव्हे हें मात्र ध्यानांत ठेवावें. अर्थात् ब्रह्म म्हणजे अभौतिक प्रकाशरूप अथवा अभौतिक तेजोरूप असें तें आहे. या जीवास अशा त्या निरतिशय

अभौतिक प्रकाशरूप परब्रह्मात्मवस्तूचें दर्शन कोणत्या द्वारानें होत असतें याबद्दलही वेदपुरुषांनीं स्पष्ट उल्लेख केलेला आहे. तो असा—

मनसैवानुद्रष्टव्यं । दृश्यतेत्वग्र्ययाबुद्ध्यासूक्ष्मयासूक्ष्मदर्शिभिः॥

म्हणजे याचें जें दर्शन सूक्ष्म द्रष्ट्यांसच केवळ होत असतें तें अंतःकरणाच्या द्वारा होतें, पण तें अंतःकरण गुरूपदेशादिकांनीं संस्कृत असून निर्मल व स्थिर असें पाहिजे. अर्थात् एकाग्र व सूक्ष्म अशा बुद्धीच्या योगानें त्याचें दर्शन होत असतें. तथापि तें विषयरूपानें तिला गम्य किंवा दृश्य आहे असा अर्थ नाहीं, तर तें तिला स्वभासकत्वरूपानें अथवा स्वसाक्षिभूत रूपानें जाणतां येतें. हा ब्रह्मात्मसंज्ञित स्वरूपप्रकाश वेद्य आहे, अर्थात् अविषयत्वेंकरूनच म्हणजे अविषयरूप अशा प्रकारानेंच तो वेद्य आहे. आतां अशारूपानें तरी जीवाचे बुद्धीला वेद्य होण्यास ती शुद्धसत्वप्रधानच पाहिजे; कारण, नेहमीं प्रमेयानुसारें प्रमाण पाहिजे असतें. धारणा, ध्यान, समाधि, अशा अवस्थांमध्यें तर हा ब्रह्मात्मवस्तूचा प्रकाश अधिक अधिक स्पष्ट व निकट असाच प्रतीतीला मिळतो. निर्विकल्प दशेमध्यें हें ब्रह्मात्मतत्वस्वरूप आपल्या पूर्ण उज्ज्वल प्रकाशरूपानें आणि केवळ आनंदरूपानें अनन्यत्वेंकरून गम्यमान होत असतें. सारांश, अंतःकरणाच्या सत्त्वाची जशी जशी अधिकता वाढेल, तसा तसा या ब्रह्मात्मवस्तूंतील प्रकाश आणि आनंद यांचा हृदयंगम तीव्रपणा व निबिडपणा प्रतीतीला येतो. आतां बुद्धीच्या किंवा इतर पदार्थांच्या सत्वगुणाची किंमत कशी कमी किंवा जास्त असते, हें एका दृष्टान्तानें समजून येईल. म्हणजे असें कीं, सूर्यबिंब हें स्वस्थानीं केवळ एक प्रकाशमात्ररूपाचें आहे; पण तेंच उपाधिभूत पदार्थांतील सत्वाच्या तारतम्यानुसार कसें कसें स्फुरत असतें हें सर्वांस प्रायः विदितच आहे. म्हणजे सूर्यकांतास या सूर्याच्या प्रकाशाची चमक कशी

आहे, तीच स्वच्छ पाण्यांत कशी असते, रस्त्यांतील धुराळ्यांत कशी असते, मातीच्या ढेकळांत कशी असते, दगडांत कशी असते, आणि आपल्या डोळ्याच्या इंद्रियांत कशी असते. सारांश, या निरनिराळ्या उपाधिस्थलीं तारतम्य आहे हें उघडच आहे. म्हणजे तो सूर्य स्वतः अगदीं एकरूप असून औष्ण्य आणि प्रकाश यासंबंधानें उपाधींतील सत्त्वाच्या तारतम्यानुसारच तेथें तेथें बिंबतो. त्याप्रमाणें हा ब्रह्मात्मवस्तुप्रकाशही आपल्या प्रत्येक उपाधिभूत पदार्थांतील सत्त्वगुणाच्या तारतम्यानुसार बिंबत आहे. ह्मणजे ब्रह्मादिपिपीलिकेपर्यंत सर्व सजीव पदार्थांतील अंतःकरणसंज्ञित उपाधींत तोच प्रकाश जाणीव, चैतन्य, भान, स्फुरण यारूपानें स्फुरत आहे; आणि आकाशापासून तृणापर्यंत जड पदार्थांत त्यांतील व्यक्ततेच्या किंवा आविर्भावाच्या रूपानें अथवा सत्तादिकरूपानें तो प्रकाश स्फुरतो. एवंच चर आणि अचर, किंवा जड आणि चेतन अशा दोन्ही प्रकारच्या पदार्थांचे सर्वांगभर ब्रह्मात्मवस्तूचा प्रकाश निरंतर स्फुरत किंवा चमकत आहे ही गोष्ट जरी खरी आहे, तरी त्यांत उपाधिपरत्वें तारतम्य आहे हें सर्वथा विश्वविख्यात आहे. अंतःकरणांत स्फुरण, बुद्धींत निश्चय, मनांत संकल्प, इंद्रियांत ऐकणें, स्पर्श होणें, हुंगणें, चाखणें, पाहणें, हीं सर्व ह्या ज्ञानघन अशा ब्रह्मात्मसंज्ञित प्रकाशाचींच रूपें आहेत. पण एकाच ब्रह्मात्मप्रकाशाचीं हीं जीं इतकीं रूपें आहेत, तीं या अंतःकरणादिक उपाधिपरत्वें त्यांतील सत्त्वाच्या तरतमभावमूलक आहेत. अर्थात् दिव्य तेजोराशीभूत किंवा घनप्रकाशरूप सूर्यगोल आणि तितक्या दूर अंतरावरून या भूगोलावर आलेला त्याच्याच किरणांचा प्रकाश किंवा ऊन्ह यांत जें एक प्रकारचें तारतम्य आहे, तसेंच तारतम्य ऐनें ब्रह्मात्मप्रकाशांत आणि शरीरादिक इतर पदार्थांत व्यक्त झालेल्या ज्ञानं, भानं, वेदना, स्फुरण,

व्यक्तता, सजीवपणा, यांमध्यें आहे. तेव्हां ऊन्ह पाहून सूर्य जसा मनांत आणावयाचा आहे, तसें अंतर्यामांतील स्फुरण, जाणीव, भान, भास, वेदना, श्रवणदर्शनादिक अशा या प्रकाशरूपांवरून किंवा सजीवपणावरून निरतिशय उज्ज्वल, कोट्यावधिसूर्य ज्यावरून ओंवाळून टाकावे अशा त्या बिंबभूत ब्रह्मात्मप्रकाशाची ओळख करून घ्यावयाची आहे. असो, आपलें ब्रह्मसंज्ञित तात्त्विक स्वरूप 'केवलज्ञान' या शब्दानें जसें वापरलें जातें त्याप्रमाणें त्यास प्रकाश, ज्योति, तेज इत्यादिक संकेतही आहेत. अर्थात् हा प्रकाश भौतिक नव्हे. लौकिक नव्हे. असें मात्र पूर्ण ध्यानांत ठेवावें. नाहींतर ब्रह्म ह्मणजे दृष्टीस दिसणारा एक प्रकाश आहे अशीच वेडगळ समजूत होईल. म्हणजे आकाशाकडे या चर्मचक्षूंनीं संतपणें एकाग्र होऊन पाहूं लागल्यास वर्तुलाकार असे प्रकाशमय परमाणु किंवा बारीक बारीक कण दिसूं लागतात. जों जों अधिक पाहूं लागावें, तों तों अधिक आणि पुंजरूप असे ते गरगर फिरत आहेत असें दिसतें. किंबहुना आपल्या अंगाभोंवतीं त्यांचा वेढाच पडला आहे असें वाटूं लागतें. अथवा कांहीं काळ घडलेल्या अभ्यासबलानें तर आपण प्रकाशाच्या डोहांत बुडी मारून बसलों कीं काय असें कांहीं विलक्षण वाटूं लागतें. अथवा प्राणायामपूर्वक धारणा, ध्यान, जप इत्यादि साधनाभ्यास करीत असतांना क्वचित् कपिलाषष्ठीच्या योगाप्रमाणें एखादे समयीं अकस्मात् एकदम जिकडे तिकडे प्रकाशच प्रकाश भरला आहे असा कांहीं चमत्कार दृष्टीस पडतो, त्याच्या योगानें हर्षही वाटतो, अथवा परमार्थाच्या साधनश्रमाचें हें एक अपूर्व महाफलच आहे, असें या साधकास वाटूं लागतें. किंबहुना 'ब्रह्म' ह्मणून जी कांहीं एक विलक्षण वस्तु शास्त्रांनीं प्रतिपादलेली आहे. तीच हा दृष्टिगोचर होणारा प्रकाश, असें समजून धन्यता वाटणारे-

ही कित्येक लोक आहेत. त्या लोकांस प्रकाशवादी असें ह्मणतात; व यांच्या मतास प्रकाशवाद असें म्हणतात. परंतु असले प्रकाश आपल्या अंतर्यामांत एक जाणीवकळा आहे म्हणून दिसतात. अर्थात इतर दृश्यभास भासणें काय आणि असे समुच्चित कोटीप्रकाश दिसणें काय, सारखेंच आहे. या ज्ञानास, प्रकाश, ज्योति इत्यादिक संज्ञा असल्याबद्दल आम्हीं जीं शास्त्रीयवचनें उल्लिखित केलीं, तींच वचनें हे प्रकाशवादीही घेतात; आणि आपल्या मताचें समर्थन करूं पहातात. पण अर्थ समजण्यांत मात्र थोडासा विपर्यास होत असला पाहिजे. ह्मणजे आम्ही ह्मणणार कीं, हें शास्त्रप्रतिपादित ब्रह्मात्म-वस्तु तमोरूप नाहीं, किंवा तें, अज्ञानरूप अंधकार नाहीं, ह्मणून त्यास प्रकाशरूप, ज्योतिरूप असें ह्मणणें आलें; आणि बुद्धिवृत्तीला तदाकारता आल्यानें तें अगोचर असूनही साक्षात्कार योग्य, अर्थात् अविषयत्वेंकरूनच तें वेद्य असतें अशा अभिप्रायानें तें दृष्टिगोचर होतें असें म्हणणें आलें. त्याच्यासारखें अगोदर निरतिशय स्वयं-प्रकट असें कोणी नाहीं, इतकें तें प्रकट आहे, म्हणून त्यास कोटी-सूर्यसमप्रभ असेंही म्हटलें. तथापि "पदार्था ऐसें ब्रम्ह नोहे, मा तें हातीं धरोनि द्यावें," हा **समर्थांनीं** प्राकृत भाषेंत सांगितलेला शास्त्रीय सिद्धांत प्रत्येक खऱ्या जिज्ञासूनें सर्वथा लक्षांत वागविला पाहिजे, असो. आपल्या आत्म्याच्या तात्त्विकस्वरूपाचें लक्षण इत्या-दिक काय आहे या प्रश्नाचे उत्तरांत 'ज्ञान, भान,' इत्यादिक त्याचीं लक्षणें आहेत, असें सांगितलें; आणि याच ज्ञानास प्रकाश असेंही आह्मी ह्मणतों ही गोष्ट ते वेळीं बोलून गेलों. पण तसें ह्मणतांना त्या प्रकाशवादांतील दूषणीय अंश कोणता हें लक्षांत ठेवणें योग्य आहे, इतकी सूचना अवश्य पाहिजे. ह्मणून थोडासा खुलासा करावा लागला.

येथें आतां प्रसंगात आला आहे ह्मणून आह्मी असेंही सांगून

ठेततो की, ह्याच प्रज्ञात्मसंज्ञित, असंग, उदासीन व नित्यनिरंतर सर्वत्र स्फुरद्रूप अशा ज्ञानरूप प्रकाशास साक्षी, द्रष्टा अथवा विज्ञाता, असा निर्देश करतात. पण येथें थोडेसें वर्म आहे तें ध्यानांत ठेवलें ह्मणजे कांहीं धास्ती नाहीं. तें वर्म इतकेंच कीं, द्रष्टा विज्ञाता, साक्षी असें ह्मटल्यानें त्या ज्ञानस्वरूपास कर्तृत्वरूप अहंकार हा उपाधि लावलासा किंवा नेसवलासा करून आणि दृश्यभासाशीं त्याचा सापेक्षसंबंध जोडलासा करून द्रष्टा, विज्ञाता, साक्षी, असा शब्दव्यवहार घडत असतो. असा कांहीं एक प्रकार आहे. परंतु विवेकदृष्टीनें नीट न्याहाळून पाहतां अहंकाराचा तो कर्तृत्वरूप धर्म त्यावर केवळ आरोपित आहे; तें तर ज्ञानतत्व निर्धर्म, निरहंकार, उदासीनपणानें प्रकाशमात्रस्वरूप, आपले ठिकाणीं नित्य निश्चल, असंग असेंच प्रतिष्ठित आहे. मात्र त्याच्यावांचून कोणाची कसलीही वेदना उल्लेखास येत नाहीं हें मनांत आणतां, सावधगिरीनें त्यास द्रष्टा, साक्षी, विज्ञाता, असें ह्मटलें तर त्यास दूषण न होतां भूषणच शोभणार आहे. पुनः विवेकाच्या युक्तीनें पहातां तो कर्तृत्वरूप अहंकारही त्याच ज्ञानवस्तूच्या प्रभेचे योगानें उल्लेखास येतो, ह्मणजे वेद्य होतो हें कांहीं कोणास नाकबूल करतां येणार नाहीं. तेव्हां ज्ञानांशावर साहंकारकर्तृत्वरूप धर्म नाहीं हें अगदीं उघड आहे. ह्मणजे तें साहंकारकर्तृत्व ह्या ज्ञानतत्त्वाच्या स्वरूपांतील घटकतत्त्व नाहीं. यास उदाहरण असें पहा कीं, दीप हा काय पदार्थ आहे, त्याचें स्वरूप काय आहे हें विचारून पाहतां तो केवळ प्रकाश मात्र आहे, प्रकाशैकरूप आहे. ह्मणजे प्रकाशाची एक मूर्तिच तो आहे. पण त्याच्या योगानें आपल्यास भोंवतालच्या पदार्थांच्या रंगरूपाकृतींचें स्पष्टीकरण होत असतें किंवा प्रकाशन होत असतें, याकरितां तोच त्या पदार्थांचा प्रकाशक आहे असें आपण ह्मणतों, परंतु प्रकाशक

ह्मणजे जो प्रकाश करतो तो, असा त्याच्या पाशीं आपल्या कर्तृत्व-धर्माचा उल्लेख आहे असें त्याविषयीं आपल्यास समजतां येणार नाहीं, अर्थात् आपणच परभारें त्याच्यावर प्रकाशकर्तृत्वाचा धर्म जोडतों. एरवीं त्याच्या बाजूनें पाहतां, त्यास आपल्या प्रकाशकर्तृत्वाच्या कल्पनेचें स्वप्नही नाहीं. तो बिचारा आपला निर्व्यापार प्रकाशमात्र-स्वरूपानें समीपस्थित असतो इतकेंच कायतें. त्याच्या प्रकाशरूप सत्तेवांचून पदार्थांचें प्रकाशन होत नाहीं हें मात्र खरें. याकरितां आपण आपल्या कल्पनेनें त्यास 'प्रकाशक' असें आतां उघडया डोळ्यानें ह्मणूं या, आणि त्यास धन्य ह्मणून शरणही जाऊं या; पण हा कोणताच प्रकार त्याच्या गांवीं देखील नाहीं. याप्रमाणें, आपल्या अंतर्यामा-तील ज्ञानसंज्ञित प्रकाशाची स्थिति आहे. त्याच्या सहज केवल उदासीन सान्निध्यमात्रानें सर्व वस्तूंचें वेदन किंवा स्फुरण होत असतें तरी प्रकाशनकर्तृत्वरूप धर्म किंवा विकार त्यास नाहीं. तो आपला अखण्डपणानें एकरस, निश्चल आणि निर्व्यापार असा हळूच कधींपा-सून जो एकदाचा स्फुरद्रूप होऊन राहिला आहे तो तसाच निरंतर आहे. आतां दीपप्रकाशास ज्याप्रमाणें त्याच्या उपकारगुणास्तव आपण परभारें प्रकाशक असें म्हणत असतों, त्याप्रमाणें ह्या ज्ञानसंज्ञितप्रकाशास द्रष्टा, विज्ञाता, साक्षी इत्यादि रीतीनें त्याच्या उपकारगुणाकरितां ह्मणणें आहे. असें रहस्य येथें आहे; तें न कळतां दुसरी अशी एक चूक होत असते कीं, या ज्ञानसंज्ञित प्रकाशवस्तूचे अगदीं सन्निध असणारे जे हे प्रकृतिसह अहंकारबुद्ध्यादिक पदार्थ, ते त्या प्रकाशानें व्यापले जाऊन किंवा परिपूरित होऊन प्रकाशाकार होतात; आणि मग, 'मी जाणतों, मी पहातों, मी साक्षी,' अशी आपली स्वरूपस्थिति भावनेसह वाणी-कडून वदवितात. म्हणजे हेच जणूं कांहीं जाणतात, असा अह कल्पकल्प अविवेक्याचे ठिकाणीं विरूढ होऊन बसतो. सारांश, ज्ञानांत कर्तृत्व-

रूप अहंकारादिक वृत्तीचा लेश नाहीं; आणि बुद्ध्यहंकारादिकांत ज्ञानलेशही नाहीं, असा निर्णय विवेकांतीं सिद्ध असतां, तो मनांत न घेतां 'मी जाणतों मी जाणतों' असा धूम व्यवहार चाललेला असतो. तेव्हां याबद्दल सावधगिरी ठेवण्याविषयीं बराच इषारा केला आहे तो आतां बस्स आहे. आम्ही सांगावयास आरंभ काय केला आहे कीं, हा ज्ञानसंज्ञित प्रकाश आपल्या तात्त्विक आत्मवस्तूची खूण आहे, किंवा लक्षण आहे, किंबहुना तो स्वरूपच आहे. तेव्हां हें लक्षण ध्यानांत धरून त्याच्या धोरणानें आपण आपल्या तात्विक स्वरूपाच्या भेटीस जाणें आहे. त्या भेटीची गोष्ट पुढें प्रांजल होणार आहे. त्यापूर्वीं आमचें असें सांगणें आहे कीं, त्याच्या भेटीसाठीं कोणासही पायपिटी करण्याचें कारण नाहीं. मुळींच हालावयास नको; बसल्या जागींच त्याची सहज भेट आहे, असें समजावें. ह्मणजे आम्हीं पूर्वीं एकदां असें सांगितलेंच आहें कीं, आपल्या स्वतःचे विषयीं कोणास ओळख नाहीं असें नाहीं. अर्थात् आपण म्हणजे आत्मा; मग आपली आपल्यास भेट ती काय! किंवा आपल्यास आपलें ज्ञान किंवा परिचय म्हणजे ओळख होणें हें तरी काय उगाच बोलणें! म्हणजे प्रत्येकास सर्वत्र आत्मा आहेच; आणि त्याचा अनुभवही आहे. सारांश, आत्मज्ञानाकरितां यत्न नको आहे. आत्मा तर प्रसिद्धच आहे. तसा त्याचा परिचयही सिद्धच आहे. कसा बसा तरी आहेच आहे. कोणी म्हणेल कसा आहे तो सांगा पाहूं. टीक आहे, सांगतों त्याकडे लक्ष असूं द्यावें. लक्ष दिल्यास सर्व कळतें.

आत्मा म्हणजे अशी वस्तु कीं, जिच्या योगानें देह, इंद्रियें, प्राण, अंतःकरण आणि त्रिगुणसाम्यरूप मूलप्रकृति (जिला माया, अज्ञान, अव्यक्त, अव्याकृत असें म्हणतात) अशीं हीं सर्व तत्त्वें सचेतन होतात. यावरून चैतन्य हेंच आत्म्याचें तात्त्विक स्वरूप आहे,

इतकें पक्केपणीं लक्षांत ठेवलें पाहिजे. पण केवळ चैतन्य हेंच खरें आत्मतत्त्व असें परीक्षण करण्यांत एक वेदान्तवादीखेरीज करून बाकी सर्व तत्त्वविचार करणारे लोकांची दृष्टि चकून गेली. म्हणजे चैतन्यानें व्यापलेले जे हे देहादिक आभास, यांसच आत्मा असें ते मानून राहिले. तथापि इतकी गोष्ट खरी कीं, ह्या देहादिकांस आत्मा असें समजण्यांत त्यांतील **सचेतनपणा** ही खूण ते विसरत नाहींत. म्हणजे असें पहा कीं, स्थूल देहाला आत्मा मानणारे जे नास्तिक आहेत, ते तशा केवळ देहासच आत्मा असें समजत नाहींत. कारण, नाहींतर ते शवासही आत्मा म्हणून कवटाळते, परंतु तसें ते करीत नाहींत. यावरून चैतन्यविशिष्ट जो हा देह, तो आत्मा असेंच त्यांचें मत आहे असें म्हटलें पाहिजे. तेव्हां आत्म्याचा परिचय या नास्तिकशिरोमणीसही आहे. आतां चैतन्याभासानें व्याप्त अशा इंद्रियांचा या जड शरीरांत प्रवेश असल्यावांचून हें शरीर प्रेतच आहे असें निद्रामूर्छादिक अवस्थेवरून अगदीं उघड होत आहे, हें मनांत येऊन देहास आत्मा समजण्यास लज्जा वाटूं लागून इंद्रियेंच आत्मा असें थोडें शुद्धीवर आलेल्या लोकांच्या मतीं ठरलें. अर्थात् येथेंही इंद्रियेंच आत्मा असें समजण्यांत तरी सचेतनपणा ही खूण धरूनच तसें समजलें जातें, हें लक्षांत घेतलेंच पाहिजे. पण इंद्रियें देखील स्थूल अस्थिमांसमय शरीराप्रमाणेंच जड प्रेतवत् आहेत, असें पुनः त्याच निद्रादिक अवस्थांवरून चांगलें सिद्ध होत आहे. याशिवाय तीं चैतन्याभासानें व्याप्त होतात तेव्हांच ती स्वस्वव्यापार करूं लागतात. म्हणजे नुसते डोळे उघडे असले तरी समोरून कोण आलें गेलें हें समजण्यांत येत नाहीं, यावरून त्यांत चैतन्याभास नसला पाहिजे. आतां त्यामध्यें चैतन्याभास येतो तो कोणाचे द्वारा येतो, हें पाहणें असल्यास मनाचे द्वारां येतो असें समजावें. कारण, मन

इंद्रियद्वारीं आलें तर त्या त्या इंद्रियांचा नीट व्यवहार होतो. अर्थात् मनांत व्याप्त असलेल्या चैतन्याभासानें तीं इंद्रियें व्याप्त होतात, असें म्हटलेंच पाहिजे. म्हणून पूर्वींच्यापेक्षां आणखी अधिक शुद्धीवर आलेल्यांच्या मतीं चैतन्याभासानें व्याप्त असलेलें मनच आत्मा असें वाटूं लागलें. तथापि संकल्पविकल्पात्मक किंवा कल्पनावृत्तिरूप जें हें मन, तेंही चैतन्याभासानें व्याप्त नसेल तर निःस्वरूपच तें आहे; म्हणजे संकल्पादिशक्तिशून्य तें असतें, यावरून त्यांत चैतन्याभासाचा प्रवेश अन्य कोणाचे तरी द्वारा होतो. तेव्हां मग तें वावरूं लागतें. अर्थात् मनाच्या कक्षेचे पलीकडे असलेला व जो चैतन्याभासानें व्याप्त असलेला बुद्धिसहित अहंकार, त्याचा अन्वय मनोरूपतत्त्वांत झाल्यावांचून मनोव्यापार व्यवस्थित होत नाहीं, हें अगदीं उघड आहे. यावरून मन आत्मा नव्हे, तर चैतन्याभासानें व्याप्त असा बुद्धिसहित जो अहंकार तोच आत्मा असें पुढें वाटूं लागतें. इतक्या पल्ल्यावर जो आला तो बराच शुद्धीवर आला असें समजावें. कारण, व्यवहारदशेंत जीव ही संज्ञा यालाच पुष्कळ अंशीं शोभते. येथेंच बौद्धमताचा प्रवेश आहे. क्षणिक बुद्धि म्हणजे विज्ञान, यांसच जे आत्मा मानतात ते बौद्ध. अर्थात् त्यांना तरी येथें आत्मत्व कबूल झालें याचें कारण त्या क्षणिक विज्ञानांत, किंवा बुद्धिवृत्तिस्वरूपांत सचेतनपणाची खूण आहे, म्हणजे हें बुद्धितत्त्व चैतन्याभासानें व्याप्त आहे हें उघड आहे; पण येथील आत्मत्वाविषयींची देखील श्रद्धा उडते. याचें कारण, गाढ झोपेंत या बुद्धिसहित अहंकाराचा लय सर्वसंमत आहे. तेव्हां स्वप्नजागृतिरूप उत्थानकालीं त्याच्या आविर्भावांत चैतन्याभास व्याप्त असतो, म्हणूनच सर्व व्यवहार समंजसपणाचा होऊं लागतो. यावरून यांत तरी चैतन्याभासाचा प्रवेश आहे असें म्हटलें पाहिजे. तो कोणाचे

द्वारा आहे हें पाहूं गेल्यास त्रिगुणांची साम्यावस्थारूप जी प्रकृति, तिच्या द्वारा या बुद्धिसह अहंकारांत तो चैतन्याभास प्रविष्ट आहे असेंच ह्मटलें पाहिजे. कारण, बुद्धिसहित अहंकाराच्या उदयाचे पूर्वी त्यास कारणीभूत सूक्ष्मतत्त्ववस्तु ही गुणसाम्यरूप प्रकृतिच आहे; तेव्हां तिच्यांतूनच हा चैतन्याभास बुद्धिसह अहंकारांत अवतरला पाहिजे. ह्मणजे कार्यांत असणारा प्रभाव कारणीभूत मूळतत्वांतूनच आला पाहिजे असा न्याय आहे. त्या न्यायानुसार हा सर्व प्रकार आहे. यावरून एक गोष्ट उघड होत आहे; ती अशी कीं, ही गुणसाम्यरूप जी प्रकृति (जिला भिन्न भिन्न निमित्तपरत्वें माया, अव्याकृत, अव्यक्त, अज्ञान इत्यादि संज्ञा आहेत) तिच्यांत हा चैतन्याभास मूळ आहे. वेदान्तशास्त्राप्रमाणें ईश्वर म्हणून ज्यास ह्मणतात, तें हेंच सशक्तिक तत्व आहे. म्हणजे त्रिगुणसाम्यावस्थारूप जी मूळ प्रकृति, आणि तिच्यांतील तो चैतन्याभास, असे हे उभय अंश मिळून वेदान्तशास्त्रोक्त ईश्वर आहे. यासच शबल ब्रह्म, सगुणब्रह्म, अंतर्यामी, इत्यादि संकेत आहेत. भक्तजनांस किंवा उपासकांस परमेश्वर ह्मणून उपास्य किंवा भजनीय केवळ आपला आत्माच असा जो वाटत असतो, तो हाच पदार्थ; याचें तरी कारण हेंच कीं, त्यांत सचेतनपणाची खूण आहे; म्हणजे त्यांत चैतन्याचा आभास आहे ह्मणून तो आत्मा असें त्यांचे मतीं ठरतें. केवळ जड प्रकृतीस आत्मा किंवा ईश्वर असें त्यांच्यानें ह्मणवत नाहीं; असो. परंतु सच्छास्त्र आणि सद्गुरु यांच्या कृपेनें जेव्हां कांहीं विवेकजन्य ज्ञानाचा लाभ या जीवास होऊं लागतो, तेव्हां कळूं लागतें कीं, गुण हे जड आहेत; ते स्वतः अप्रकाशरूप आहेत. ते विदित होतात, ते वेद्य आहेत, तेही दृश्य जातींतलेच आहेत. अर्थात् यांना प्रकाशक कोणी कांहीं तरी आहे. आणि जें कोणी आहे, तें त्यां-

च्याशीं संसर्गशून्य असें शुद्ध असलें पाहिजे, तरच प्रकाशकाहून वेगळेपणें हा प्रकाश्यरूप वस्तुसंघ प्रतीत होणार. आणि तसाच तो प्रतीत होत असतो. यावरून प्रकाशक, हा प्रकाश्याहून अलिप्त, असंग आहे असें ठरतें. म्हणजे तो प्रकाशक किंवा त्याचा तो प्रकाश, मूळ स्वतः निरुपाधिक, अतएव केवळ, निरंजन, असाच असला पाहिजे. सारांश, अशा चिदाभासासह गुणसाम्यावस्थारूप मूळ प्रकृतीला जें कांहीं प्रकाशक, तेंच शुद्ध चैतन्य. ह्मणजे निरुपाधिक व केवळ चैतन्य ह्मणणें तें अशा सूक्ष्म विवेकदृष्टीनेंच आहे. स्थूल व्यवहारदृष्टीनें इतका हा बारकावा मनांत येण्यासारखा नाहीं. आह्मांस मुख्य सांगावयाची गोष्ट ही कीं, कोणी मोठा उपासक असो, व्यवहारांत गढलेला असा अगदीं साधारण मनुष्य असो, बाल असो किंवा स्त्री असो, पंडित असो किंवा मूर्ख असो, कोणीही मनुष्य असो; प्रत्येकास आत्मत्वाची खूण सचेतनपणांत आहे हें चांगलें कळून आहे. ह्मणजे आत्मा कोणाला अपरिचित आहे असें नाहीं. चैतन्य हेंच आत्मत्वाचें खरें निर्वाहक तत्व आहे, हें अगोदरच अगदीं स्वाभाविकपणें अध्याहृत आहे. ह्मणजे मायाकल्पित जे हे नामरूपाकार विशेष, यांनीं विशिष्ट असा हा आत्मा असो, किंवा हे विशेषणभूत नामरूपाकार आपल्या स्वरूपीं अगदीं वरवर वर्तविणारा अशा प्रकारचा हा आत्मा असो, कसा कां होईना, तरी पण त्यांत परम सारभूत चैतन्यरूप आत्मत्वाचाच वास्तविक अखंड अनुभव घेऊन हे असतात. आतां पश्यंतोपि न पश्यन्ति ह्मणजे पहात असून किहो हे लोक पहात नाहींत! असा जो त्यांचा उपहास करण्यांत येतो, याबद्दल मात्र कारण आहे. म्हणजे जर पर्यवसानीं एक हें केवळ किंवा स्वतः निर्विशेष असें चैतन्यमात्रच आत्मा ह्मणून तत्त्वभाव ठरत आहे, तर मग मायाकृत ते नामरूपाकार विशेषांस या शुद्ध

असंग आत्मत्वाच्या अभंग कक्षेंत घुसडून देऊन तो हा आत्मा, त्या जड मायारूप अलंकारांनीं नित्यसंयुक्तच आहे असें या लोकांस कां वाटावें ! असें भलतेंच अशुद्धरूप यांस कसें दिसावें ! ! वास्तविक पहातां तसें दिसूं नये, परंतु अविवेकवशात् तसेंच त्यांस दिसतें, ह्मणजे तसेंच ते पहातात. म्हणून ते पहात असून पहात नाहींत, अर्थात् ते बरोबर पहात नाहींत असें आहे. ह्मणून त्यांचा उपहास होतो तो थोडासा तरी योग्यच आहे. कसेंही कांहीं असो, आत्मत्वाची खूण सचेतनपणांत आहे इतकी गोष्ट तरी कोणी कधीं देखील चुकत नाहीं हेंही येथें पुष्कळच आहे. आणि ह्मणून केवळ चैतन्य तेवढें सोलिव आत्मतत्व आहे, अशी केव्हां तरी विवेकबलानें समजूत पटते. एकंदरींत आत्मा जसा प्रकट आहे, तसा तद्विषयींचा अनुभव किंवा परिचयही सर्वांस प्रकट आहे. माया, अज्ञान, प्रकृति किंवा कल्पना व तत्कृत जे हे नामरूपाकार विशेष, यांच्या सिद्धीवरून, ह्मणजे हे स्फुरतात यावरून, किंवा यांचा उल्लेख होतो यावरून, येथें त्यांहून पृथक् ह्मणून अलिप्त परंतु व्यापक असा स्फोरक कोणी तरी आहे, त्यांचा ज्ञापक साक्षिभूत कोणी तरी आहे हें अगदीं उघड आहे, तेंच चैतन्य असें समजावें. चैतन्य या शब्दाचा मूळ लक्ष्यार्थभूत धात्वर्थच 'ज्ञान' असा आहे. हा ज्ञानरूप प्रकाश स्वयमेव सिद्ध आहे; अशा शुद्धचैतन्यास किंवा स्वयंसिद्ध स्वप्रकाशरूप ज्ञानासच तत्वतः आत्मा किंवा ब्रह्म असें म्हणतात, हें आम्हीं पूर्वीं सांगून ठेविलेंच आहे. अशा रीतीनें आम्हीं आपल्या सर्वांच्या तात्त्विक आत्मस्वरूपाची थोडीशी दिशा दाखविली, ती ध्यानांत अगदीं घट्ट धरावी.

आम्ही ज्यांस नास्तिक असें कधीं कधीं ह्मणतों, त्यांच्याकडून व कांहीं आस्तिकांकडून अशी एक नेहेमी शंका पुढें येत असते कीं, हें

ज्ञानप्रकाशरूप चैतन्य, पंचभूतांच्या योग्य संयोगीं उत्पन्न होणारा एक गुण आहे. म्हणजे नागवेलीचीं पानें, चुना, कात, इत्यादि पदार्थ कुसकुरून एकत्र केले असतां त्यांत लालपणा हा एक जसा गुण उत्पन्न होतो. तसा पंचभूतांच्या योग्य मेलनापासून चैतन्य हा एक गुण उत्पन्न होतो. अर्थात् या मिलित पंचभूतांत बिघाड झाला ह्मणजे तो चैतन्य गुण नष्ट होतो. ह्मणजे यांचे मतीं काय आहे तें सारे हें विस्खलित किंवा व्यवस्थित असें भूतपंचक मात्र खरें आहे! किती उलट न्याय आहे तो पहा कीं. सत्ताचैतन्यरूप अशा आत्म्यापासून हीं सर्व स्थूलसूक्ष्म, व चराचरात्मक अशीं भूतें, हीं पंचमहाभूतें उत्पन्न होतात किंवा व्यक्त दशेस येतात; असा सच्छास्त्रसिद्धान्त असून हे जडशास्त्रवादी ह्मणतात कीं, या पंचभूतांपासून तें चैतन्यस्वरूप आत्मतत्त्व उत्पन्न होतें! असो, तथापि या दूषित मतप्रवृत्तीस प्रतिबंध करतां येतो. ह्मणजे त्या मताचे अभिमान्यांस अगोदर असें विचारलें पाहिजे कीं, ही जडस्वरूप सर्व भूतें, सादि आणि सान्त अशीं आहेत? किंवा अनादि आणि अनंत, किंवा अनादि आणि सान्त, किंवा सादि आणि अनंत अशीं आहेत? कशीं जरी तीं असलीं, तरी त्यांची सिद्धि किंवा असिद्धि ह्मणजे त्यांची व्यक्तावस्था किंवा अव्यक्तावस्था, या चैतन्यरूप ज्ञानावांचून, या प्रकाशावांचून प्रस्थापित होऊं शकत नाहीं. त्यांची व्यक्तता किंवा अव्यक्तता कितीही परमावधीच्या अवस्थेची असो, तरी तिचा आगापिछा या चैतन्यसंज्ञित ज्ञानात्मक प्रकाशानें अखंडितपणें वेढल्यावांचून या भूतांच्या गोंधळास लेशमात्रही जागा मिळत नाहीं. ह्मणजे हा सर्व ज्ञापक साक्षीभूत प्रकाश आगाऊ सिद्ध असल्यावांचून कसलाही मांड थाटत नाहीं. हें लक्षांत घेतां हें प्रकाशरूप ज्ञानाकार चैतन्य नित्य निरंतर व स्वतंत्र स्वयंसिद्ध विद्यमान आहे असें निरपवाद

आणि निर्विवाद ठरलेंच पाहिजे. अर्थात् हा चैतन्यस्वरूप प्रकाश भूतपंचकाच्या संयोगानें नसता गुण उत्पन्न होतो असें प्रतिपादन अत्यंत विवेकहीन आहे. किंवा या पंच भूतांहून आत्मा ह्मणून एक अतिरिक्त द्रव्य आहे पण तें जड आहे. आणि चैतन्य किंवा ज्ञान हा त्या जड आत्म्याचा गुण आहे, हें प्रतिपादनही तसेंच विवेकशून्य आहे. ह्मणजे प्रकाशित करणारा हा प्रकाशित होणाऱ्याचा धर्म किंवा गुण ठरूं जाणार. परंतु जो ज्याच्याशीं विरोधी, तो त्याचा गुण कसा मानवला जावा? अग्नि हा थंड आहे, किंवा पाणी उष्ण आहे, हा कोटीक्रम कोणीही विवेकी ऐकून घेणार नाहीं. त्याप्रमाणें जडाचा धर्म हें चैतन्य आहे, असें कधीच मानतां येत नाहीं. आतां जडसंबंध सोडून हें ज्ञानरूप चैतन्यवस्तु कसें निरुपाधिकपणें व निरालंबपणें आपण आपल्या स्वताचे ठिकाणीं विराजमान आहे हें बहिर्मुखास जरी अगदीं दुर्बोध आहे, ह्मणजे त्यास तें अत्यंत अव्यक्त आहे, सरासरी त्याच्या दृष्टीनें अप्रकट आहे, तरी पण तेंच पुनः त्या जडरूप पदार्थाच्या सापेक्षतेनें तसल्याच उपाधीचे द्वारा आपला स्फुरद्रूपपणा जाणवीत असतें. हा घट आहे, हा पट आहे असे जे पदार्थाकार मनोबुद्धींद्रियजन्य प्रत्यय, हे त्याच मूळच्या अव्यक्त चैतन्याचें व्यक्त स्वरूप आहेत. अज्ञदृष्टीनें त्यास अव्यक्त किंवा अप्रकट असें उगाच क्षणभर ह्मणणें आहे. त्यांतील अभिप्राय असा कीं, सर्व पदार्थांच्या आदि किंवा अंतीं इतर कोणीच त्यास समजून घेण्यास उत्पन्न झालेला नाहीं किंवा उरत नाहीं, अशा अंगानें तें अव्यक्त आहे असें क्षणभर बोलून पाहिलें इतकेंच कायतें; ह्मणून एवढ्यावरून तें खरेंच अप्रकट असतें असें नाहीं; असें असेल तर जगदांध्य प्राप्त होईल. अर्थात् तें स्वसंवेद्यच आहे. यांत आह्मांस असें दाखविणें आहे कीं, देहपातोत्तर भस्म

होऊन गेल्यावर आत्मत्व किंवा जीवत्व पतकरण्यास कांहीं पुरावा नाहीं, असें जें नास्तिक मत तें अत्यंत अविचारग्रस्त आहे. देहपातोत्तर आत्मत्व न मानणाऱ्यानें गाढ झोंपेंतील तरी आपलें अस्तित्व कां मानावें ? ह्मणजे तेथें या जडमूढ अस्थिमांसमय देहाचा किंवा विषयांचा संबंध हा मूर्ख नास्तिक ओळखीत नसून तेथील आनंदानुभव मात्र यास जागेपणींही कबूल आहे. अर्थात् तेथें तर हा तद्रूपच होऊन पडलेला असतो. म्हणून सांगावयाची गोष्ट इतकीच कीं, देहपात होणें किंवा भस्म होणें यांत आत्म्याच्या नास्तित्वाची कांहीं एक खूण नाहीं. ह्मणजे असें पहा कीं, अग्नि हा मूळ नसेलच तर दोन काष्ठांच्या घर्षणापासून तरी तो व्यक्त कां व्हावा ! काष्ठ हें जळणारें असून अग्नि हा दाहक आहे. ह्मणजे जो ज्याचा विरोधी तो त्याचा गुण किंवा धर्म होऊं शकत नाहीं. यावरून, अग्नि ही स्वतंत्र वस्तु आहे, ती काष्ठास जाळण्याकरितां त्या काष्ठास तिनें आक्रांत केलें; ह्मणजे ती त्यांत व्यक्त झाली; आणि शेवटीं त्याचें भस्म केलें. इतका प्रकार जर होत आहे, तर पुढें तो दिसेनासा झाला एवढ्यावरून तो कांहींच नाहीं असें समजणें म्हणजे निव्वळ बुद्धिजाड्य आहे. अर्थात् तो आपल्या मूळच्या अव्यक्त शांतरूपांत स्थिर आहे असेंच म्हटलें पाहिजे. म्हणजे नसताच तर आला असता कसा ? कारण, नाहीं तें नाहींच आणि आहे तें असणारच. ह्मणजे नाहीं तें भासलें तरी नाहीं; आणि आहे तें न भासलें तरी आहे असा येथें उलट न्याय आहे. ह्मणजे अन्वयव्यतिरेकानें जें सिद्ध, तें सिद्ध, अन्यथा सर्व मिथ्या असा निर्णय आहे. दुसरें असें उदाहरण पहा कीं, कोणी एक मनुष्य कांहीं बोलण्यास प्रवृत्त होणार आहे, त्यापूर्वीं तो मौनस्थिति प्रकृत आहे; आणि पुढें बोलणें समाप्त झाल्यावरही तो मौन स्थिती-

वर येतो. तेव्हां येथें आतां असें कोणी समजणार नाहीं की, तो बोलत होता तेव्हांच तो दुसऱ्याच्या प्रत्ययास येण्याजोगा स्फुरद्रूप ठरतो; आणि बोलण्याचें पूर्वीं व पश्चात् तो दुसऱ्यास स्फुरद्रूप नसला तरी त्याच्या अंगानें तो स्फुरद्रूप नाहीं असें कांहीं कोणाच्यानें ह्मणवणार नाहीं. तसेंच आपल्या अस्तित्वाविषयीं वर्तमानक्षणीं जर स्फूर्ति आहे, तर त्याच्या पूर्वभूतक्षणीं ती स्फूर्ति अनुगत आहे असें ह्मटलें पाहिजे. अर्थात् भूत आणि वर्तमान अशा दोन कालीं जर स्वसत्तेची स्फूर्ति आहे तर पुढील क्षणीं ती नाहीं असें ह्मणण्यांत मौर्ख्य आहे. हें जें अल्प कालाच्या भूत भावि वर्तमान स्थितींच्या उदाहरणांत आत्म्याचें अनुगत स्फुरद्रूप अस्तित्व दर्शित केलें आहे, एवढ्यावरून अनंत जरी काल मानला तरी त्यांतही आत्म्याच्या अस्तित्वाचा अखंडितपणा तसाच आहे हें विचारकास कबूल आहे. बाहेर भूमिवर असलेला घट जितक्या मानानें दृश्य ह्मणून प्रकाशाहून वेगळा आहे, तितक्याच मानानें हा अस्थिमांसमय देहही दृश्य आहे ह्मणून तो अंतस्थ चित्प्रकाशाहुन अगदीं पृथक् आहे. सदा गतिरूप जो चंचळ वायु तो या शरीरांत संचार करतो तरी पण तो ज्ञानसंज्ञित चित्प्रकाशरूप आहे, असा अनुभव नाहीं. जर तो प्राण तसा असता, तर झोंपेंत कडोसरीचे चोरानें नेलेले पैसे समजले गेले असते त्या जड प्राणास वृद्धिक्षय आहेत, हेंही मान्य आहे. तो प्राणवायु स्तब्ध आणि चंचळ करतां येतो. हें त्याचें स्वरूप आणि त्याचा गुण जो स्पर्श, असा तो एकंदरींत वेद्य कोटींत समाविष्ट करतां येतो; तेव्हां तो जड आहे, तो तर स्वपरप्रकाशरहित आहे; त्यास आत्मा असें कसें म्हणतां येईल ! इंद्रियांतील तीव्रता, मंदता, आणि शेवटीं नष्टता या गोष्टी अनुभवतां येतात. तीं इंद्रियें नसलीं तरी आपल्या सजीवत्वाची निश्चित स्थिति आहे. यावरून त्यांतील

सचेतनपणा त्यांचा वास्तविक नाहीं; तो दोन दिवस उसना घेतलेला होता, तो पुढें परत घेतला जातो. ह्मणजे इंद्रियें आत्मा नव्हत. मनाचें स्वरूप संकल्प विकल्प हेंच आहे; आणि असे किति तरी ते उदयास येतात आणि लयास जातात हें अगदीं खडान् खडा त्यांच्या साक्षीभूत चित्प्रकाशांत विदित होत असतें. असलें मन बिचारें आत्मा कसा होईल? बुद्धीचें आणि वास्तविक आत्म्याचें सूक्ष्मत्व आणि स्वच्छत्व याबाबतींत साम्य आहे, त्यामुळें तादात्म्याध्यासानें बुद्धींत सचेतनपणा भासतो, आणि तीच आत्मा म्हणून क्षणभर मिरवते, पण ती क्षणोक्षणीं बदलते. आतां घटाकार असली तर पुढच्या क्षणीं पटाकार बनते, आणि तिला कांहींच विषय मिळाला नाहीं ह्मणजे ती शून्याकार होते, इतका त्या बुद्धिविषयीं अगदीं स्पष्ट निर्णय जर कोणा एका स्वाभाविक प्रकाशतत्वाच्या पुढें होत आहे, तर ती बुद्धिच तो प्रकाश कसा होईल. बुद्धि ही एक निश्चय संज्ञित वृत्ति आहे, ह्मणजे ती एकप्रकारचा अज्ञानमूलक अंतःकरणाचा परिणाम आहे, तो आपल्यास वेद्य होतो, यावरून ही बुद्धि आपल्या प्रकाशकाच्या प्रकाशाहून वेगळी आहे, तो तिला व्यापीत असूनही तिच्यांत तो अलिप्त ह्मणजे तिला अस्पृश्य असाच असतो. ह्मणून असें उघड होतें कीं, ती बुद्धि कांहीं तो प्रकाश खास नव्हे. तसाच कर्तृत्वरूप अहंकार हें तत्त्व विकारी आहे; तो अहंकार उत्पत्ति आणि विनाशही पावतो, असें ह्या असंग व शुद्ध ज्ञानरूप चैतन्यप्रकाशांत स्पष्टपणें अनुभवास येतें. यावरून त्या अहंकारास आत्मा असें समजणें चूक आहे. सामान्यविशेषरूपानें असणारा हा अहंकार, इतर वेद्य पदार्थांप्रमाणेंच वेद्य होणारा आहे. तो स्वतः अप्रकाशरूप आहे, ह्मणजे जड आहे. तो परमसूक्ष्म, शांत, गुप्त असो, किंवा ऊर्मींच्या रूपानें गुबारा धरून उचंबळणारा अशा

रूपानें अगदीं स्पष्ट असो. तो येथें आगंतुकच ठरतो. मनांत आणलें तर आपल्याला त्यास घालवून देतां येतें, जिरवितां येतें, किंवा नाहींसा करतां येतें, इतका हा त्याचा प्रकार ज्या एका अखंड चित्प्रकाशांत होतो, त्याची सर या अहंकारास कशी यावी ? तो अहंकार कांहीं चित्प्रकाशरूप, ज्ञानात्मक, अखंडैकरस आणि अविनाशी असा आत्मा ठरत नाहीं हें कोणींही निःसंशय समजलेंच पाहिजे. आतां, वाटेल त्या आकाराची होणारी ती विकारी बुद्धि, व तो कर्तृत्वरूप अहंकार हे ज्याचे परिणाम ह्मटले जातात, असें जें बहुसूक्ष्म, सामान्यवृत्तिरूप अंतःकरण, ज्यास उन्मेष किंवा स्मरण किंवा नुसती सावधवृत्ति असें ह्मणतात, असलें अंतःकरणही आत्मा नव्हे; कारण, हेंहीं कार्यरूपच आहे, यास आदि व अंत आहे, तें जड आहे, वेद्य आहे, अर्थात् त्या प्रकाशित करणाऱ्या आत्मसंज्ञित चित्प्रकाशाहून तें पृथक् रूपानें प्रतीतीला येतें. ह्मणजे तें अंतःकरण कांहीं आत्मा होऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें हें अगदीं प्रथम कार्यभूत अंतःकरण ज्याचा परिणाम ह्मटलें जातें, असें जें अव्याकृतसंज्ञित, प्रकृतिसंज्ञित, मायारूप त्रिगुणसाम्यरूप मूळ अज्ञानतत्त्व, ‘ मला कळत नाहीं ’ हा ज्याचा आकार, असलें हें अज्ञान, तेंही आत्मा नव्हें. आत्मा हा चित्प्रकाशरूप आहे. त्याच्या नित्य प्रकाशापुढें या अज्ञानाचा उल्लेख होत असतो, यावरून तें जडरूप आहे, व तें विनाशी आहे हें तर प्रसिद्धच आहे. ह्मणजे वस्तुबोधानें त्याचा नाश होत असतो. अशा विनाशी अज्ञानास आत्मा कसें ह्मणावें ? कारण, आत्मा तर निरतिशय प्रिय, आणि अज्ञान नित्य अप्रिय, स्वातंत्र्येंकरून पाहतां तें अत्यंत निःस्वरूप आहे. अज्ञान हा पुरुषार्थ नाहीं. म्हणजे जीवास प्रिय होणारा पदार्थ नाहीं. असो, आत्मत्वाची खूण ज्ञानसंज्ञित प्रकाशरूप चिन्मात्रतेंत आहे. आत्मा